रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक २७ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ३ जुलै २०२४

किंमत ४ ₹

### मोरा-मुंबई जलसेवा बंद

**उरण :** मंगळवारी सुटलेल्या सोसाट्याचा वारा, अतिवृष्टी व खराब हवामान यामुळे भारतीय हवामान विभागाने समुद्रात धोक्याचा इशारा दिल्याने उरणमधील मोरा-मुंबई जलसेवा मार्ग बंद ठेवण्यात आला आहे. ही सेवा शुक्रवारी सुरू होण्याची शक्यता बंदर विभागाने व्यक्त केली आहे. उरणच्या मोरा, जेएनपीटी व करंजा या तीन बंदरातून मोरा ते मुंबई, जेएनपीटी ते मुंबई व करंजा ते रेवस या जलमार्गाने मार्गावर पावसाळ्यात ही सेवा सुरू असते. सोसाट्याचा वारा, अतिवृष्टी व खराब हवामानामुळे समुद्र खवळला आहे. त्यामुळे प्रवासी वाहतूक करणे धोक्याची असल्याने ही जलसेवा बंद करण्यात आली आहे.

### अंबादान दानवे विधानपरिषदेतून निलंबित

**मुंबई :** राहुल गांधी यांच्या वक्तव्यावरुन भाजप आमदार प्रसाद लाड आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे एकमेकांसमोर भिडले होते. प्रसाद लाड यांनी त्यांच्याकडे बोट दाखवून विधान केलं होतं. त्यानंतर अंबादास दानवे यांनी आक्रमक होत, प्रसाद लाड यांना शिवीगाळ केली होती. शिवीगाळ प्रकरणानंतर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी निलंबन करण्यात आलं आहे. प्रसाद लाड यांच्या वक्तव्यानंतर अंबादास दानवे टिका करत म्हणाले, माझ्यावर बोट दाखवण्याचा, माझ्याकडे बोट दाखवून बोलण्याचा सदस्याला अधिकार नाही.



## हाथरसमध्ये चेंगराचेंगरी; १२२ जणांचा मृत्यू

**। हाथरस । वृत्तसंस्था ।**

उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये भोले बाबांच्या सत्संगादरम्यान चेंगराचेंगरी घटना घडली. यामध्ये १२२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. १५० हून अधिक जखमी आहेत. अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### मृतांची संख्या वाढण्याची शक्यता

हाती आलेल्या माहितीनुसार, हातरस येथील सिकंदरराव कोतवाली भागातील फुलराई गावात भोले बाबाचा प्रवचनाचा कार्यक्रम सुरू होता. अपेक्षेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने एकच गोंधळ उडाला. एका अंदाजानुसार १.२५ लाख लोक या सत्संगसाठी आले होते. गर्दीमुळे लोकांचे हाल होऊ लागले. उन्हामुळे लोक बेशुद्ध झाले आणि नंतर चेंगराचेंगरी झाली. लोक जमिनीवर पडले तेव्हा इतर लोक त्यांना चिरडून बाहेर येऊ लागले.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी हाथरस चेंगराचेंगरीतील मृतांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत जाहीर केली आहे. मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. २४ तासांत चौकशी अहवाल मागवला आहे. हाथरसमधील परिस्थिती अजूनही नियंत्रणात नाही. सर्वत्र मृतदेह दिसत आहेत.

**आजचा अग्रलेख**

**आणीबाणी म्हणजे काय?**

**वे।ध।क**

### दुचाकी अपघातात युवकाचा मृत्यु

**रसायनी :** दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा मासळी बाजाराजवळ टेम्पो व दुचाकीच्या झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील युवकाचा जागीच मृत्यु झाल्याची घटना मंगळवारी (दि.२) घडली. पराडेहून भरधाव वेगात टेम्पो दांड फाट्याच्या दिशेने येत असताना चालकाने ताब्यातील टेम्पो निष्काळजीपणाने चालवून अचानक उजव्या बाजूला घेवून ब्रेक मारल्याने त्याच्या पाठीमागील येणाऱ्या दुचाकीचालक उमेश दिनकर मोहिते टेम्पोच्या पाठीमागील उजव्या बाजूस धडकल्याने अपघात घडला. या अपघातात दुचाकीस्वार उमेश दिनकर मोहिते याच्या डोक्यास साध्या व गंभीर स्वरुपाच्या दुखापती होवून त्याचा जागीच मृत्यु झाला. याप्रकरणी टेम्पो चालक चंदनकुमार यादव यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जरांगेंचा मुक्कामावर ड्रोनच्या घिरट्या

**जालना :** मनोज जरांगे पाटील हे सध्या अंतरवाली सराटी गावातील सरपंचांच्या घरी तळ ठोकून बसले आहेत. मात्र, सोमवारी मध्यरात्री मनोज जरांगे यांचा मुक्काम असलेल्या घरावर एक ड्रोन घिरट्या घालत असल्याचे दिसून आले. त्यामुळे मनोज जरांगे यांचे अंतरवाली सराटी येथील आंदोलनस्थळ आणि ते राहत असलेल्या घराची ड्रोनद्वारे टेहळणी सुरु असल्याची चर्चा सुरु झाली आहे. या प्रकरामुळे अंतरवाली सराटीच्या ग्रामस्थांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. सोमवारी मध्यरात्री एक ड्रोन मनोज जरांगे यांचा मुक्काम असलेल्या घराभोवती फिरत होते. त्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी स्वत: गच्चीवर जाऊन पाहणी केली. यानंतर त्यांनी सहकाऱ्यांशी चर्चाही केली. या प्रकाराबद्दल अंतरवाली सराटीचे सरपंच आणि ग्रामस्थांनी पोलिसांना तोंडी तक्रार दिली आहे. आता पोलीस घटनास्थळी येऊन पाहणी करण्याची शक्यता आहे. चार दिवसांपूर्वीच अंतरवाली सराटीत अशाचप्रकारे ड्रोन घिरट्या घालताना दिसून आला होता.

# जयंत पाटील यांचा विजय निश्चित

## ▶▶| उद्धव ठाकरे यांचा विश्वास ▶▶| महायुतीचे टेन्शन वाढले

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**येत्या १२ जुलै रोजी होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २) शेकापक्षाचे ज्येष्ठ आमदार जयंत पाटील यांनी आपला निवडणूक अर्ज विधान भवनात भरला. जयंत पाटील यांना महाविकास आघाडीचा पाठिंबा जाहीर केलेला आहे. त्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित आहे, असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.**



### विधानपरिषदेच्या उमेदवारीसाठी शेकापचे आ. जयंत पाटील यांचा अर्ज दाखल

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या अकरा जागा २७ जुलै रोजी रिक्त होत आहेत. या जागा विधानसभा सदस्यांमधून निवडल्या जाणार आहेत. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत मंगळवारी संपली. विधानसभेतील संख्याबळाच्या आधारे भाजपचे ५, एकनाथ शिंदेंची शिवसेना २, काँग्रेस १, उद्धव ठाकरे १ व शरद पवार गटाच्या पाठिंब्याने शेकापचे आ. जयंत पाटील यांनी अर्ज दाखल केला आहे. आ. जयंत पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण , काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले तसेच जयंत पाटील यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान होणार असून मंगळवारी दुपारपर्यंत उमेदवारी अर्ज करण्याचा शेवटचा दिवस होता. यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून ११ जागांसाठी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. विधानसभेतील संख्याबळाच्या आधारे भाजपचे ५, एकनाथ शिंदेंची शिवसेना २, अजित पवारांची राष्ट्रवादी २ तर महाविकास आघाडीतील काँग्रेसचा १ उमेदवार, ठाकरे गट १ व शेकापक्षाचे १ असे एकूण १२ उमेदवार दिल्याने विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार मैदानात आहेत. त्यामुळे निवडणुकीत मोठा ट्विस्ट आला असून मते फुटण्याच्या भीतीने महायुतीचे टेन्शन वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

विधान परिषदेसाठी महायुतीमधील भाजपने पंकजा मुंडे, योगेश टिळेकर,डॉ. परिणय फुके,अमित गोरखे आणि सदाभाऊ खोत यांना उमेदवारी दिली आहे. तर शिंदेंच्या शिवसेनेने दोन माजी खासदारांना उमेदवारी जाहीर केली आहे. यात भावना गवळी आणि माजी खासदार कृपाल तुमाने यांच्या नावांचा समावेश आहे. तसेच अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर यांना संधी देण्यात आली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील ठाकरेंच्या शिवसेनेने पक्षाचे सचिव मिलिंद नार्वेकर यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसने दिवंगत माजी खासदार राजीव सातव यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांना संधी दिली आहे. तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादीने शेकापच्या जयंत पाटील यांना पाठिंबा जाहीर करत उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता विधानपरिषदेच्या निवडणुकीत मते फुटण्याची शक्यता आहे.

सध्या ठाकरेंच्या शिवसेनेचे १५ आमदार असून निवडून येण्यासाठी २३ मते आवश्यक आहेत. तसेच काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांना निवडून आणण्यासाठी काँग्रेसकडे ३६ मते आहेत. पान २ वर

### मुलानेच फसवणूक केल्याचा आईचा आरोप




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वडिलोपार्जित जमीन मिळकतीची मृत्यू पत्राद्वारे जाणीवपूर्वक चुकीची वारस नोंद केरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा, या मागणीसाठी पार्वती मांडवकर आणि त्यांची मुलगी सुवर्णा भोवाड यांनी मंगळवारी (दि.२) पनवेलमधील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण छेडले.

आंदोलनाठिकाणी नायब तहसीलदार सुनील जाधव यांनी भेट दिली असून आंदोलकांच्या तक्रारीची दखल घेणार असल्याचे आश्वासन दिले. जोपर्यंत लेखी आश्वासन दिले जात नाही, तो पर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा निर्धार आंदोलनकर्त्या सुवर्णा भोवड यांनी दिला आहे.

#### उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण

नारायण मांडवकर यांना कुळ कायद्याने जमीन मिळाली. त्यांच्या मृत्यूनंतर ती जमीन शंकर मांडवकर यांना मिळाली. वारसा हक्काने मिळालेल्या जमिनीवर बहिणींची नावे लागणे अपेक्षित आहे. मृत्यू दरम्यान सदरची जमीन त्यांच्या नातवाच्या नावे हस्तांतरित करण्यात आली. या विषयासंदर्भात कायदेशीर वारसांनी हरकती नोंदवल्या आहेत. हे प्रकरण तलाठी व मंडळ अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून पान २ वर

## आदिवासी, धनगर समाजाला सुविधा द्या

### आ. जयंत पाटील यांनी अधिवेशनात केली मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील आदिवासी, धनगर समाज सोयी सुविधांपासून वंचित असल्याचे आ. जयंत पाटील यांनी विधानपरिषद सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. त्यांना मुलभूत सुविधा नसल्याने गैरसोय झाल्याचेही सांगितले. त्यामुळे या समाजाला सुविधा द्या, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली. त्यावेळी आदिवासी विकास मंत्री यांनी निधी प्राप्त झाल्यावर सोयी-सुविधा उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही दिली.

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये एक हजार ४४ आदिवासी व धनगर समाजाच्या वाड्या, वस्त्या आहेत. दोन लाख ८० हजार ६१६ लोकसंख्येपैकी एक हजार ५४१ कातकरी समाजातील नागरिक अद्याप कच्च्या घरांमध्ये वास्तव्य करीत आहेत. आदीवासी वाड्यांपैकी एक हजार तीन वाड्यांचे सर्वेक्षण झाले असताना, काही वाड्यांचे सर्वेक्षण अपूर्णच आहे. आदिवासी व धनगर वाड्यांमध्ये रस्ते, शाळा, वीज पुरवठा, आरोग्य केंद्र तसेच महिलांसाठी स्वच्छतागृह या मुलभूत सोयी-सुविधा नसल्याने मोठी गैरसोय होत पान २ वर

### बाधितांच्या न्यायासाठी आक्रमक

पेण – खोपोली रस्ता रुंदीकरणामुळे कामार्ली व वाकरूळ फाटा येथील बाधित ६६ कुटूंबियांच्या घरांचे, दुकानांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. भरपाई मिळावी, यासाठी त्यांनी शासनाकडे मागणी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री, रायगडचे जिल्हाधिकारी यांच्या समवेत लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत २ डिसेंबर २०२२ रोजी बैठक झाली. फेर मूल्यांकन करण्याचे आदेश संबंधितांना दिले होते. राष्ट्रीय महामार्ग विभागाने फेर मूल्यांकन करून अहवाल शासनाला सादर केला आहे. मात्र अद्यापही त्यांना मोबदला मिळाला नाही. त्यामुळे बाधितांना मोबदला देण्याबाबत काय कार्यवाही केली असा सवाल जयंत पाटील यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी लवकरच मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार मागविण्यात आलेला मदत व पुनर्वसन विभागाला पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचे सांगितले.




● 'ग्यानबा तुकाराम' या जयघोषात माऊलींची पालखी दिवेघाट मार्गे पंढरपूरकडे रवाना झाली.

( छायाचित्र- सुधीर नाझरे)

### विजेच्या धक्क्याने गाईंचा मृत्यू; शेतकऱ्याचे नुकसान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वरई येथे एका शेतकऱ्याच्या तीन दुभत्या गाईंचा विजेची तयार अंगावर पडल्याने मृत्यू झाला. त्या दुभत्या गाईंच्या मृत्यूमुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून महावितरण कंपनीकडून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी कर्जतचे माजी नगराध्यक्ष शरद लाड यांनी केली आहे.

कर्जत छत्रपती शिवाजी नगरमध्ये राहणारे आणि मूळचे वरई येथील मोतीराम ठाकरे यांच्या तीन दुभत्या गाई वरई येथे आज सकाळी चरायला सोडल्या होत्या. त्यावेळी त्या गाईंच्या अंगावर वीज वाहिनीची तार कोसळली आणि त्या तिन्ही गाईंचा तडफडून मृत्यू झाला. ही घटना तात्काळ महावितरण कंपनीला कळविण्यात आली. वीज वाहिनीमधील वीज पुरवठा बंद करण्यात आला. या दुर्घटनेमध्ये शेतकरी पान २ वर

## रायगड जिल्हा परिषदेचे आरोग्य अभियान

# जलजन्य आजारांवर 'स्टॉप डायरिया'ची मात्रा

### जिल्ह्यातील प्रत्येक गावात करणार जनजागृती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शुदध, स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे जलजीवन मिशनअंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांचा उद्देश आहे. या अनुषंगाने रायगड जिल्हा परिषदेने रायगडकरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे. जलजन्य आजार रोखण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत स्टॉप डायरिया अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानासाठी रायगड जिल्हा परिषदेची यंत्रणा सज्ज झाली असून प्रत्येक गावात जनजागृती पथक दाखल होणार आहे.

> **"ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका यांना सुरक्षित पाणी वापराच्या महत्त्व याबाबत रॅली, पोस्टर ,पथनाट्ये तसेच घरोघरी जाऊन पत्रकांचे वाटप यांच्या मार्फत जनजागृती करण्यात येणार आहे. पाणी गुणवत्ता विषयक माहितीबाबत जनजागृती पर कार्यक्रमांचे आयोजन करून घराघरात पिण्याचे शुदध व मुबलक पाणी उपलब्ध होईल, यासाठी जिल्हयातील प्रत्येक गावाने या अभियानात सहभाग घेऊन अभियान यशस्वी करावे."**
> **– डॉ. भरत बास्टेवाड**
> **मुख्य कार्यकारी अधिकारी**
> **रायगड जिल्हा परिषद**




या अभियानामध्ये गावातील अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र ,सरकारी कार्यालये व प्राथमिक शाळा येथील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे. पावसाळ्यामध्ये दूषित पाणी पिऊन डायरिया,गॅस्ट्रो व कावीळ यासारखे अनेक आजार होत असतात त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुकीकरण करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येणार आहे.

यासाठी गाव स्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. एकूण आठ आठवडे हे अभियान चालणार असून प्रत्येक आठवड्यात वेगवेगळ्या वेगवेगळे उपक्रम गाव पातळीवर घेण्यात येणार आहेत. पाणी शुद्ध करण्याचे पान २ वर

# लाडकी बहीण योजनेतील दोन नियम बदलले

### ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी विधानसभेत केली घोषणा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. मात्र त्यातील काही अटी व शर्तीमुळे या योजनेसाठी सरसकट सर्व महिला पात्र ठरणार नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेतील नियमात शिथिलता आणली आहे.

ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न २.५०लाख रुपयांपेक्षा अधिक असेल. ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता असेल, ज्यांच्या कुटुंबातील सदस्य कायम किंवा कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी सेवेत असेल किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. परंतु बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा पान २ वर

#### दरमहा १५००रु.

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा १५०० इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेव्दारे १५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेव्दारे पात्र महिलेस देण्यात येईल.

#### नियमांत बदल?

वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या व ६० वर्षापर्यंतच्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार होता. आता ही वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत करण्यात आली आहे. तर, ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन असेल त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नव्हता. परंतु, ही जमिनीची अटही आता शिथिल करण्यात आली आहे.

## पान १ वरून

## जयंत पाटील यांचा विजय निश्चित

यातील काँग्रेसची २४ मते प्रज्ञा सातव यांना दिली गेली, तर त्यांच्याकडे १२ मते शिल्लक राहतात. ही मते आणि राष्ट्रवादी काँग्रेसची मते मिळून शेकापचे जयंत पाटील यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, मिलिंद नार्वेकर हे उद्धव ठाकरेंच्या जवळचे म्हणून ओळखले जातात. तसेच त्यांचे एकनाथ शिंदे यांच्यासह शिंदेंच्या शिवसेनेच्या आमदारांशीही चांगले संबंध आहेत. याशिवाय भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्याशीही नार्वेकरांचा चांगला सुसंवाद आहे. त्यामुळे महायुतीतील काही आमदार क्रॉस व्होटिंग करण्याची शक्यता असल्याची चर्चा दबक्या आवाजात राजकीय वर्तुळात सुरू आहे. विशेष बाब म्हणजे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील आणि शिंदेंच्या शिवसेनेतील काही आमदार ठाकरे आणि पवारांच्या पक्षात येण्यास इच्छुक असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीला मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## आदिवासी, धनगर समाजाला सुविधा द्या

असल्याची बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत या समाजाला मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली, असा संतप्त सवाल उपस्थित केला.

यावर आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी जिल्ह्यातील आदिवासी, धनगर समाजाची गैरसोय असल्याची कबुली देत निधी उपलब्ध होताच सोयी-सुविधा पुरविण्याचे आश्वासित केले.

याशिवाय आदिम जमातीच्या विकासाठी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान योजना राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.याा योजनेसाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून १५ हजार ३३६ कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारकडून मिळणार आहे. उर्वरित निधी राज्य सरकार संबंधित विभागाद्वारे उपलब्ध करून देणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आ. जयंत पाटील यांच्या प्रश्नाला उत्तर देताना गावित म्हणाले की, वसंतराव नाईक तांडा, वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हास्तरिय समितीमार्फत शिफारस केलेल्या कामांपैकी ३० कामांना प्रशासकिय मान्यता देऊन निधी उपलब्ध केला आहे. आदिवासी जमाती विकास कार्यक्रम या राज्य योजनेअंतर्गत जिल्ह्यामध्ये कातकरी समाजाला मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या दोन वर्षात २१ कोटी रुपयांचा निधी वितरीत केला असल्याचे त्यांनी सांगितले.

गेली कित्येक वर्षे जिल्ह्यातील आदिवासी अनेक सोयी-सुविधांपासून वंचित आहेत. त्यांच्या मागण्यांकडे सरकारने कायमच दुर्लक्ष केले आहे, ही बाब गांभीर्याने घेत आ. जयंत पाटील यांनी त्यांच्या मुलभूत हक्कांसाठी सभागृहात आवाज उठविला. अखेर सरकारने नमतेपणा घेत निधी उपलब्ध होताच आदिवासींचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्याने आदिवासी बांधवांनी आ. जयंत पाटील यांचे आभार व्यक्त केले.

## विजेच्या धक्क्याने गाईंचा मृत्यू; शेतकऱ्याचे नुकसान

मोतीराम ठाकरे यांचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले असून महावितरण कंपनीने नुकसानभरपाई देण्याची मागणी कर्जतचे माजी नगराध्यक्ष शरद लाड यांनी केली आहे. महावितरणचे कर्जत उप अभियंता प्रकाश देवके यांच्याशी संपर्क साधून शरद लाड यांनी शेतकऱ्याच्या नुकसानीस महावितरणची वीज वाहिनी जबाबदारी ठरली आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने मदत करावी, अशी मागणी लावून धरली आहे. त्याबद्दल महावितरणचे उपअभियंता देवके यांनी दहिवली विभागाचे सहायक अभियंता यांना वरई दुर्घटनेचा पंचनामा करून प्रस्ताव महावितरणकडे पाठवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## लाडकी बहीण योजनेतील दोन नियम बदलले

स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी असेल, लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारे १५०० रुपया पेक्षा जास्त लाभ घेतला असेल, ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार, आमदार असेल, ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किवा राज्य सरकारच्या मंडळाचे सदस्य असेल ,ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन असेल, ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) असेल त्या कुटुंबातील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, असे नियम सुरुवातीला बनवण्यात आले होते. परंतु, यातील काही
नियमांमुळे काही महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार नव्हता. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दोन नियम शिथिल करण्यात आल्याची माहिती दिली.

## मुलानेच फसवणूक केल्याचा आईचा आरोप

समजावून सांगितले होते. मात्र जाणीवपूर्वक, हेतू पुरस्कर त्यांनी हा बनाव केल्याचा आरोप या महिलांनी केला आहे. विशेष म्हणजे ही जमीन कॉरिडॉरमध्ये संपादित होत असल्याने याचे करोडो रुपये येणार आहेत. तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासाठी आजपासून त्यांनी उपोषणाला सुरुवात केली. सदरची फ ेरफार नोंद तातडीने रद्द करण्यात यावी, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी तसेच मंडळ अधिकारी यांच्या निर्णयाला त्वरित स्थगिती द्यावी अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत. याबाबत उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## जलजन्य आजारांवर 'स्टॉप डायरिया'ची मात्रा

प्रात्यक्षिक करून दाखवण्यात येणार आहे व शुद्ध पाण्याचे महत्व सांगण्यात येणार आहे. या अभियानामध्ये मुख्यतः पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन व त्याची योग्य हाताळणी, स्वच्छता जागृती कार्यक्रम, पाणी गळतीच्या जागा शोधून त्याची दुरुस्ती करणे, पाणी तपासणी बाबत गाव पातळीवर पोस्टर बॅनर्स लाण्यात येणार आहेत. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गावातील शाळा, अंगणवाड्या प्राथमिक आरोग्यकेंद्रे येथे स्वच्छता जागृती कार्यक्रम घेण्यात येणार आहे. ग्रामस्थांमध्ये कचऱ्याच्या वर्गीकरणाच्या बाबतीत जागृती निर्माण करणे यासाठी घरोघरी भेटी देऊन, कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास प्रोत्साहन देणे, याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. अंगणवाड्यामध्ये म ाता व किशोरी मुलींची स्वच्छता आरोग्य इत्यादी विषयावर मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे.

पाणीपुरवठा योजनेतील पाणी गळती शोधून त्याची दुरुस्ती करणे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करणे, घरगुती स्तरावरील पाणी साठवणुकीच्या टाक्यांची स्वच्छता करणे, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी नादुरुस्त स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणे, तसेच गावामध्ये ग्रे वॉटर मॅनेजमेंटबाबत विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये विशेष करून प्रत्येक सेप्टिक टँक असलेल्या शौचालयांना शोषखड्डा तयार करणे घरातील सांडपाणी परसबाग किंवा शोषखड्डा करून त्यातच सोडणे हे उपक्रम राबवण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याचे स्रोतांची स्वच्छता ठेवणे, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता याबाबत गावांना सक्षम करण्यासाठी गावातील सर्व घटकांचा या अभियानामध्ये सहभाग घेण्यात येणार आहे. छतावरील पाऊस पाणी संकलन करून पावसाचे पाणी साठवण्याच्या तंत्राबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

# माथेरानचा शारलोट तलाव तुडुंब

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानचे पावसाळी पर्यटन जोरात असून पावसाने दिलेल्या जोरदार सलामीने घाटातील धबधबे सक्रिय झाले असताना आता माथेरानचा शारलोट तलाव भरून वाहू लागल्याने येथील सुरक्षित धबधब्यावर पर्यटकांची गर्दी पाहावयास मिळत आहे.



माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. मात्र पावसाळ्यात डोंगरदऱ्यातून तयार होणारे फेसाळणारे पांढरे शुभ्र धबधबे पर्यटकांना भुरळ घालत असतात. सध्या पावसाने चांगलाच जोर धरला असून माथेरानमध्ये आत्तापर्यंत ७६० मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे आता पावसाळी पर्यटन हंगामदेखील जोरदार सुरू झाला आहे. डोंगरदाऱ्यांमध्ये ओसंडून वाहणारे धबधबे, इथला हिरवागार निसर्ग आणि पावसाळी धुक्यातून रस्त्याने वाट शोधत जाताना पर्यटकांच्या होणाऱ्या मज्जा मस्तीचा वेगळाच आनंद येथे असतो. माथेरान पावसाळी पर्यटन हंगामात पर्यटकांचे मुख्य आकर्षण म्हणजे येथील ओसंडून वाहणारा शारलोट तलाव धबधबा, माथेरान पर्यटनस्थळी प्रवेश करणारा प्रत्येक पर्यटक येथील शारलोट तलाव धबधब्याला भेट दिल्याशिवाय जाऊच शकत नाही. त्यातच हा तलाव मंगळवारी ओसंडून वाहू लागल्याने पर्यटकांना एक पर्वणीच मिळाली असून भिजण्यासाठी पर्यटक गर्दी करू लागले आहेत.

# दूध पुरवठा बंद करू

## दुधाच्या प्रश्नावर राजू शेट्टी आक्रमक

**। अहमदनगर । वृत्तसंस्था ।**

स्वाभिमानी शेतकरी संघटना आता दुधाच्या प्रश्नावर आक्रमक झाली आहे. दूध उत्पादनात देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात उत्पादन खर्च निघेल एवढाही भाव दुधाला मिळत नाही. येत्या चार दिवसांत सरकारने निर्णय घेऊन दुधाला किमान ४० रुपये प्रति लिटर दर द्यावा. अन्यथा सोमवारनंतर राज्यात स्वाभिमानी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरेल. वेळ पडली तर मुंबईला होणारा दूध पुरवठा रोखला जाईल, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिला आहे.

राहुरी येथील आंदोलनासाठी शेट्टी नगरला आले होते. त्यावेळी प्रसारमाध्यमांशी त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले, दुधातील भेसळ रोखली तरी दुधाला दर मिळेल, पण तशी सरकारची मानसिकता दिसत नाही. दूध उत्पादक आणि दुधासाठी आंदोलन करणाऱ्यांना वगळून दुग्धविकासमंत्री बैठका घेत आहेत. दूध अनुदान हा केवळ फार्स आहे. दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या अटींमुळे बहुतांश शेतकरी त्यापासून वंचित राहतील. ज्या राज्यात आतापर्यत दुधाचे धोरणे ठरायचे, त्या राज्यात दुधसंघाच्या सरकारी जागा हडपल्या जात आहेत. महानंदासारखी मदर डेअरी मोडीत काढली आहे. दूध दराचा प्रश्न सरकारला सोडावाच लागेल. चार दिवसात निर्णय घेतला नाही तर स्वाभिमानी असे आंदोलन करेल की सरकारला निर्णय घ्यायलाच भाग पडेल, असा इशारा शेट्टी यांनी दिला.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कवठेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. १) श्री. आशिष आर. पेठे २) श्री. संजयकुमार पी. मोहंती ३)श्री.गिरीष कृष्णाराव देशपांडे ४) श्रीमती. मिना सिध्दार्थ कामत श्री.वरूण सिध्दार्थ कामत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| १० | ९/ब/१ | ०-६०-०० | ०-६० |
| १० | ९/ब/२ | ०-२०-०० | ०-०८ |
| १० | ९/ब/३ | ०-२०-०० | ०-०८ |
| १० | ९/ब/४ | ०-२०-०० | ०-०८ |
| १० | ९/ब/५ | ०-२०-०० | ०-०८ |
| १० | ९/ब/६ | ०-२९-०० | ०-१७ |
| १० | ९/ब/७ | ०-२०-५० | ०-०८ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: ०३/०७/२०२४
**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाझर ता. अलिबाग जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत त्यांच्या विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गट क. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ११० | ०-८६-४०<br>+ पो.ख. ०-०२-६०<br>एकुण क्षेत्र ०-८९-०० | ४.२५ | १.श्री. वामन काशिनाथ पाटील<br>२. सौ.शोभा वसंत घरत<br>३. सौ.अनिता अनंत घरत |

वरील मिळकती पैकी पुर्वदिशेकडील ०-३०-०० हे. आर. ही मिळकत सदरच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्यानेही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ०१/०७/२०२४
**ॲड. महेश एस म्हात्रे**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.-९२२६८४७०७७



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



### जाहीर नोटीस
दि. ०२/०७/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सवाई विश्वास पाटील, वगैरे २ यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वाघविरा ता. अलिबाग | ७७ | एकूण ०-४८-८० | ७.२५ |

वर वर्णन केलेली मिळकत हि मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर)
पो. पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९



### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| भारती भानुदास फलकर<br>ज्योती शांताराम भालेकर | ९४/२/अ | १-००-०० | ०-५९ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०२/०७/२०२४
**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक रेश्मा रघुनाथ लबडे व वासंती वसंत बनोटे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २९ | २०/अ | ०-८२-०० पैकी विकत देणार यांच्या मालकीचे विकत दिलेले क्षेत्र ०-४०-०० | ०-४८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०३/०७/२०२४

पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
मो.नं. ९१५८३१३७३३



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक राहुल शशिकांत वाघमारे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १९ | १/ब | ०-३३-८० | १-१५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :-०३/०७/२०२४
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
मो.नं. ९१५८३१३७३३



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे ता. कर्जत, जि. रायगड जि.रायगड येथील खालील अशिलांनी मौजे. पोखरकरवाडी, ता. कर्जत, वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक सौ. विदया विजय सावंत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| २७ | ५ब | ०-८०-००<br>यापैकी विकत दिलेलं क्षेत्र<br>०-४०-०० | ०-८० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: ०३/०७/२०२४
**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२



### जाहीर नोटीस
दि. ३०/०६/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत जि. रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. सदानंद पांडुरग दाभाडे वगैरे | ३६ | ८ | १-०१-०० पैकी ०-४०-०० | ०-७८ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणत कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५



### जाहीर नोटीस
दि. ०२/०७/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक ललीता भगवान पिंगळे, वगैरे ११ यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वाघविरा ता. अलिबाग | १५५ | ०-१६-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकुण ०-१६-०० | २.४२ |

वर वर्णन केलेली मिळकत हि मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत कसल्याही खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर),
पो. पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९



### जाहीर नोटीस

आमचे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १५०१ / १, क्षेत्र ०.९४.०० (हे. आर.), पो. ख. ०.२६.२० (हे. आर.), एकूण क्षेत्र १.२० २० (हे. आर.), आकार २८.१३ (रु.पैसे), या मिळकतीपैकी विद्यमान मालक ॲड. अनिस महमद दाऊद राऊत वगैरे रा.अलिबाग सन्मान हॉटेलसमोर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकी व हिश्यात असलेले ० ८७.३० हे. आर या क्षेत्रापैकी ०.०६.०० हे. आर इतके क्षेत्र जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह सदरहू मिळकत माझे आशीलांस विकत देण्याबाबत बोलणी केलेली आहेत. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमच्या आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक ०२/०७/२०२४.
**(ॲड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस. टी. स्टॅंड जवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड, खरेदीदारांचे वकील

**निवडक**

## स्वतंत्र कक्षाची मागणी

**पनवेल :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याच्या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर केली असून महानगर पालिकेच्यावतीने यासाठी स्वतंत्र कक्षाची आणि सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करावी, अशी मागणी माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांनी आयुक्तांकडे केली आहे. तसेच, योजना गतिमान पद्धतीने राबवून शासनाचे धोरण सर्वसामान्य महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी नागरिक महापालिकेला मदत करतील असेही त्यांनी या पत्रकामध्ये म्हटले आहे.

## बदनामीकारक मजकूर

**पनवेल :** महापालिकेकडून बेरोजगारांना त्यांचा माल बाजारपेठांना उपलब्ध करून देण्यासाठी तसेच व्यवसायासंबंधी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य सेवा मिळवून देण्यासाठी शहर उपजिवीका केंद्राच्या वेबसाईटवर उद्धव ठाकरे यांच्या विषयी बदनामीकारक मजकूर टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे शिवसैनिकांमध्ये असंतोष असून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम होत आहे. तरी, तात्काळ संबंधित मजकूर हटविण्याची मागणी शिवसेना (ठाकरे) तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## पार्लरवर कारवाईची मागणी

**पनवेलः** नुकतीच कामोठे येथे हुक्का पार्लरवर कारवाई करून तेथील मालक, व्यवस्थापक व कामगार यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. अशाच प्रकारे नवीन पनवेल परिसरात सुद्धा हुक्का पार्लर सुरू असून रात्री उशिरापर्यंत सर्व नियम धाब्यावर बसवून चालणाऱ्या या हुक्का पार्लरमुळे परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तरी तरुण पिढीला व्यसनाच्या खाईत लोटणाऱ्या या हुक्का पार्लरवर शासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी या भागातील रहिवाशी करीत आहेत.

## लाखोंचा एवज लुटला

**पनवेल :** तालुक्यातील कोप्रोली गावात असलेल्या कमांडर रेनाईसन्स सोसायटीमध्ये झालेल्या घरफोडीत लाखो रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या ठिकाणी राहत असलेल्या रसिना अलिकोया यांच्या घरात चोरी होऊन घरात ठेवलेले विविध प्रकारचे सोन्याचे दागिने त्याचप्रमाणे इतर ३ ब्लॉकमध्ये सुद्धा अज्ञात चोरट्यांनी चोरी करून जवळपास २ लाख ३६ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बाबरवाडीत कृषीदिन साजरा

**पोलादपूर :** स्व.वसंतराव नाईक यांचा १ जुलै हा जन्मदिवस कृषीदिन म्हणून साजरा केला जातो. जगाचा पोशिंदा असणाऱ्या बळीराजाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असल्याने या दिवसाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नानेघोळ बाबरवाडी येथे कृषीदिन साजरा करण्यात आला. या कृषीदिनानिमित्त स्व.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन शांताराम जंगम, कृषी अधिकारी सुरज पाटील, गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या हस्ते करण्यात आले.

# खड्डेमय रस्त्याबाबत शेकाप आक्रमक

## माजी आ. पंडित पाटील यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाचा समाचार

**। पेझारी । वार्ताहर ।**

वडखळ-अलिबाग रस्त्यावर सध्या प्रचंड वाहतूक असते. या वाहतुकीमध्ये मोटर सायकल, सायकल, चारचाकी व अवजड वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करत असतात. वडखळ, पोयनाड, पळी, कार्लेखिंड, वाडगाव, सागाव, अलिबाग या भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. या खड्ड्यांमुळे छोट्या मोठ्या वाहनधारकांचा खड्ड्यात पडून अपघात होत असतात. दिवसेंदिवस हे खड्डे मोठंमोठे होत चालले असून या सर्व खड्ड्यांचा व सार्वजनिक बांधकाम विभागाचा समाचार घेताना माजी आमदार पंडीत पाटील यांनी प्रवाशांना खड्ड्यात पाडून त्यांचा जीव सार्वजनिक बांधकाम विभागाला घ्यायचा



आहे का, असा संतप्त सवाल केलेला आहे.

काही दिवसांपूर्वी पळी आणि वडखळ या ठिकाणी खड्डे चुकवताना खड्ड्यात पडून काही प्रवासी जबर जखमी झालेले आहेत. या घटनेचा आधार घेऊन माजी आमदार पंडित पाटील यांनी वडखळ-अलिबाग रस्त्याचा आढावा घेतला असता, पळी नाक्याजवळ मोठमोठे खड्डे पडलेले असल्याचे दिसून आले. हे खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ बुजवावेत व प्रवाशांचा जीव वेठीस धरू नये. कारण या रस्त्यावर मोठ-मोठी वाहने भरधाव वेगाने प्रवास करत असतात. त्यामुळे त्यांना वाट देताना मोटरसायकल व छोटी वाहने खड्ड्यात आपटतात. यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. यापुढे अशा खड्ड्यांमुळे कोणाचा मृत्यू झाल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल करू नये, असा प्रश्न करत माजी आमदार पंडित पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षाकडे लक्ष वेधले आहे.

> अलिबाग तालुक्याच्या विकासामध्ये खराब रस्त्यांमुळे अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिकांनी दक्ष राहिले पाहिजे. तसेच, सार्वजनिक प्रश्नासंदर्भात नेहमी आवाज उठवला पाहिजे.
>
> – माजी आमदार पंडित पाटील

# आपत्ती व्यवस्थापन प्रमाणपत्र वितरण




**। पेझारी । वार्ताहर ।**

पेझारी येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालयाचे संस्थापक आणि को.ए.सो.चे माजी अध्यक्ष ॲड. दत्ता पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. ४ ते १० मार्च या कालावधीत नागरी संरक्षण दल उरण-रायगड यांच्या सहकार्याने आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेत एकूण ४८ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्याचा प्रमाणपत्र वितरण समारंभ सोमवारी (दि.१) माजी आमदार पंडीत पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी माजी आमदार पंडीत पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे असे कार्यक्रम जनतेसाठी पुन्हा-पुन्हा राबवून जनतेला प्रशिक्षित केले पाहिजे व जनतेने याकडे प्रामाणिकपणे लक्ष देऊन स्वतःबरोबर कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे रक्षण केले पाहिजे. कारण, आपत्ती ही कधीही घडू शकते म्हणून दक्षता घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. असे कार्यक्रम घेण्याबद्दल आमचे पूर्ण सहकार्य प्रशासनाला राहील, असेही आश्वासन माजी आमदार पंडितशेट पाटील यांनी दिले.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थिनी, प्रकाश म्हात्रे, डॉ. व्यंकटराव कर्ले, अनिल पाटील, सुरेश पाटील, डॉ. दिलीप पाटील, डॉ. संगीता चित्रकोटी, महेश बिऱ्हाडे, संतोष बिरारे, निलेश कुलाबकर, जयवंत वालेकर, सारिका म्हात्रे, ज्योत्स्ना पाटील, समीर पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रमाणपत्राचे वाचन डॉ.अनिल बांगर यांनी केले व आभार दलीप सोनवणे यांनी मानले.

# श्रीवर्धन समुद्रकिनारा विद्रुप

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

सध्या श्रीवर्धन समुद्रकिनारा हे पर्यटकांसाठी कोकणातील क्रमांक एकचे पर्यटन ठिकाण झालेले आहे. कारण या समुद्रकिनाऱ्यावर सुसज्ज व सुशोभीकरण केलेला धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात आलेला आहे. या बंधाऱ्यांवर पर्यटकांना बसण्यासाठी बाकडी, त्याचप्रमाणे मचाण तयार करण्यात आलेले आहेत. तसेच, विविध ठिकाणी सेल्फी पॉईंट, विद्युत रोषणाई, त्याचप्रमाणे कोळंबी, खेकडा यासारख्या समुद्र प्राण्यांच्या जातीच्या प्रतिकृती समुद्रकिनाऱ्यावर लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते.



तसेच, पर्यटक या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर येत असल्यामुळे समुद्र किनाऱ्यावरत विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावणाऱ्यांची गर्दी सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. या स्टॉल धारकामध्ये जे जुने स्टॉल धारक आहेत ते नगरपरिषद हद्दीच्या बाहेरील आहेत व नव्यानेच ज्यांनी जागा अडवून स्टॉल उभारलेले आहेत ते नगरपरिषद हद्दीमधील स्टॉल धारक आहेत. परंतु, आपले स्टॉल उभे करताना जागा अडवण्यासाठी या स्टॉल धारकांकडून जुन्या फाटलेल्या साड्या किंवा जुने कपडे लाऊन जागा अडवलेली आहे. त्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारा अतिशय विद्रूप झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# कोकणातील शेतकरी धीट अन् कणखर

## शिवानी जंगम यांचे प्रतिपादन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कोकणातील माणसं ही कष्टकरी आहेत. भले गरिबीत राहत असले तरी मनाने धीट आणि कणखर आहेत. प्रतिकुल परिस्थितीवर मार्ग काढण्याची ताकद कोकणच्या माणसांमध्ये असल्यामुळेच कधी आत्महत्या करत नसल्याचे प्रतिपादन खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम यांनी शेतकऱ्यांच्या सन्मान सोहळ्यात बोलताना केले आहे. कृषी दिनाचे औचित्य साधत स्वामीनी महिला प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्षा कांचन जाधव यांनी वर्षभर शेतात राबणाऱ्या अन्नदात्याचा सन्मान सोहळा सोमवारी (दि.१) वावोशी येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता.




# विजेच्या लपंडावामुळे माथेरानकर त्रस्त

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये सातत्याने वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रकारामुळे स्थानिक त्रस्त झाले असून वीज वितरण कंपनीबाबत तीव्र संताप व्यक्त करत आहेत. यापूर्वी सगळीकडे विजेच्या पोलांवरून वीज पुरवठा केला जात होता. परंतु, वादळी वाऱ्याने मोठमोठे वृक्ष विजेच्या पोलांवर आणि तारांवर मुळासहित उन्मळून पडत असल्याने कित्येक दिवस वीज पुरवठा खंडित होत असे. त्यानंतर याठिकाणी विजेची भूमिगत लाईन टाकण्यात आली आहे. तरीदेखील बत्ती गुल होण्याचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढलेले आहे.

यातच मंगळवारी (दि.२) सकाळी शास्त्री हॉलच्या मागील बाजूस वाऱ्याने विजेचे पोल पूर्णतः वाकलेले असल्याने काही भागातील वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. विशेष म्हणजे



पावसाळ्यात आपत्कालीन प्रसंगी शासकीय अधिकारी माथेरानमध्ये रहात नाहीत. सद्यस्थितीत माथेरानमध्ये कोणत्याही शासकीय अधिकारी वर्गाला फारशी कामे नसतात. तरीसुद्धा ही मंडळी इथे राहण्यास टाळाटाळ करत असुन याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

> लाईट जाण्याच्या नेहमीच्या त्रासामुळे पर्यटनावर मोठा परिणाम झाला असून शालेय विद्यार्थ्यांना ने आण करणाऱ्या ई–रिक्षांना चार्जिंग नसल्यामुळे विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागत आहे. एकूणच इथल्या महावितरणच्या नियोजनशून्य कारभारामुळे सर्वांनाच समस्यांना सामोरे जावे लागत आहे.
>
> – भास्करराव शिंदे, उद्योजक, माथेरान

# नवी मुंबईकडील पाणीपुरवठा बंद करणार



**। रसायनी । वार्ताहर ।**

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोर्बे धरणासाठी जमीन संपादीत करताना शासनाने जी आश्वासने दिली होती ती पाळली नसल्याने प्रकल्पग्रस्तांचा गेल्या तीस वर्षांपासून संघर्ष सुरु आहे. धरणग्रस्तांनी पुन्हा २७ जुन पासून धरणासमोरील परिसरात साखळी उपोषण सुरु केले आहे. मंगळवारी उपोषणाचा ७ वा दिवस असूनही नवी मुंबई महानगरपालिकेचा कोणीही अधिकारी फिरकला नसल्याने प्रकल्पग्रस्त संतापले आहेत. आज ३३ वर्षांचा कालावधी लोटला तरीही न्याय्य हक्कांसाठी लढा द्यावा लागत आहे. या सारखे दुर्दैव नाही, अशी प्रतिक्रिया उमटली आहे. शासनाने कोणतीही दखल न घेतल्यामुळे गुरूवारी (दि.४) नवी मुंबई पालिकेला होणारा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा जगन्नाथ पाटील यांनी दिला आहे.

# वीजवितरण विरोधात संतापाची लाट

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

शिहू बेणसे विभागाची विजसमस्या मागील अनेक वर्षांपासून जैसे थे दिसून येते. वर्षाचे बारा महिने उन्हाळा, पावसाळा व हिवाळा कोणत्याही ऋतूत विजबत्ती गुल होऊन विजेचा लपंडाव सुरूच असतो. वर्षानुवर्षे विजवीतरण विभागाकडून जनतेला वेठीस धरले जात आहे. वीज समस्येसंदर्भात मंगळवारी (दि.२) बेणसे सिध्दार्थ नगर येथे बैठक पार पडली.


या बैठकीत वीज वितरण विभागाने दोन दिवसात वीजपुरवठा सुरळीत केला नाही तर पेण विजवीतरण कार्यालयावर भव्य मोर्चा काढून अधिकाऱ्यांना घेराव घालू, असा इशारा यावेळी देण्यात आला. तर, विजवीतरण विरोधात शिहू बेणसे विभागातील जनतेत संतापाची लाट असून दोन दिवसात उपाय करा अन्यथा विजवीतरण अधिकाऱ्यांना कोंडून ठेऊ, असा ही इशारा देत महिला व तरुण आक्रमक झाले आहेत. यावेळी बबन अडसुळे, अ.का. म्हात्रे, विजय एटम, अनंत भुरे, अनिल शिंदे, उत्तम सावंत, योगेश अडसुळे, सुरेश भगत, सुनील पवार, प्रशांत गोरे, महेंद्र ठाकूर, हरेश पाटील, अनंत पाटील, नरहरी ठाकूर, प्रवीण म्हात्रे, कल्पना अडसुळे, सुमन अडसुळे, कविता अडसुळे, छायाबाई सावंत, पद्माआई अडसुळे, सुषमा अडसुळे, आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.



# मोकाट घोड्यांच्या विष्ठेमुळे दुर्गंधी

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन शहरात सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे पर्यटकांची संख्या कमी झालेली आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरती असणाऱ्या घोडागाड्या किंवा घोड्याची सवारी करणाऱ्या घोड्यांना सध्या काम नसल्याने मोकाट सोडून देण्यात आले आहे. घोड्यांच्या शहरातील मुक्त संचारामुळे शहरातील नागरिक त्याप्रमाणे शेतकरी, बागायतदार प्रचंड प्रमाणात त्रस्त झाले आहेत. एका वेळेला पंधरा ते वीस घोड्यांचा कळप नारळ, सुपारीच्या वाड्यांमध्ये घुसतो व त्या ठिकाणी असलेल्या झाडांचे नुकसान करतो. त्याचप्रमाणे



समुद्रकिनारी असलेल्या भात शेतीमध्ये देखील घोडे घुसत असून शेतीचे देखील खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच, घोडे उनाड फिरत असल्यामुळे अनेक ठिकाणी विष्ठा टाकत असतात. त्यामुळे परिसरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात दुर्गंधी देखील पसरत आहे.

काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगरपरिषदेकडे कोंडवाडा उपलब्ध होता. त्यामुळे पकडून आणलेले घोडे किंवा गुरे कोंडवाड्यात ठेवली जात असत. संबंधित प्राण्यांचा मालक आल्यानंतर त्याच्याकडून रीतसर दंड वसूल केला जात असे. त्याची त्याला पावती देखील दिली जात असे व त्यानंतरच पकडलेली गुरे किंवा घोडे यांना सोडण्यात येत असे. परंतु, नगर परिषदेने कोंडवाड्याच्या जागी पर्यटक निवास बांधल्याने श्रीवर्धन नगरपरिषदेचा कोंडवाडा रद्द बातल निघाला आहे. त्यामुळे घोडे पकडले तर ठेवायचे कुठे, हा प्रश्न श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनासमोर आहे.

## ९८ हजार हेक्टर क्षेत्रात भाताची लागवड

# शेतीच्या कामातून आदिवासींना रोजगार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यामध्ये भात लावणीला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील अनेक भागात लावणीच्या कामाची लगबग सुरु झाली आहे. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदीवासी समाजाला लावणीच्या कामातून आता रोजगार मिळू लागला आहे. जूलै अखेरपर्यंत त्यांना काम मिळणार असल्याने आर्थिक बळ त्यांना उपलब्ध होण्याची शक्यता आहे.**

आदिवासी समाजातील काही मंडळी पाऊस संपल्यावर विटभट्टीवर कामाला जातात. त्यातून त्यांचा कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित असतात. त्यानंतर पावसाळ्यात शेतीची कामे करतात, तर काहीजण डोंगरावर उताराच्या ठिकाणी भाजीपाल्याची लागवड करून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित असतात. रायगड जिल्ह्यामध्ये ९८ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात लागवड केली जाणार आहे. गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यामध्ये पावसाने सुरुवात केली आहे. शेतकरी



आता लावणीच्या कामांमध्ये मग्न असल्याचे दिसून येत आहे. लावणीची कामे करण्यासाठी मजूरकर म्हणून आदिवासी पुरुष व महिला काम करू लागले आहेत. मोठया शेतकऱ्यांकडून त्यांना मागणी वाढली आहे. महिनाभर हे काम राहण्याची शक्यता आहे. यातून आदिवासी समाजातील शेकडो बेरोजगारांना रोजगाराचे साधन खुले होणार आहे.

जिल्ह्यातील अनेक शेतांमध्ये आदीवासी समाज लावणीची कामे करत आहे. भात लावणीच्य ठिकाणी वेगवेगळ्या भागातून त्यांना गाडीतून आणणे, संध्याकाळी लावणीची कामे पुर्ण झाल्यावर त्यांना घरापर्यंत पोहचविण्याचे काम शेतकऱ्यांकडून केले जाते.

> भात लागवडीला सुरुवात झाली आहे. रोपे लावणीसाठी कामगार म्हणून आदिवासी समाजातील पुरुष, स्त्रियांना मागणी आहे. वेगवेगळ्या भागातून ही मंडळी लावणीच्या कामासाठी येतात. त्यांच्या कामाचा योग्य मोबदलाही दिला जातो.
>
> - सतिश म्हात्रे, शेतकरी

# निकृष्ट धान्य दिसूनही लॅबमध्ये तपासणी का ?

**। पेण । प्रतिनिधी ।**

जिल्हयातील मध्यांन भोजन आहार विभाग कृषीवलच्या बातमीने खडबडून जागा येऊन कामाला लागला आहे. दोन दिवसांपूर्वी गटशिक्षण अधिकारी अरूणादेवी मोरे व जिल्हा पोषण आहार अधिक्षक राजेंद्र गायकवाड यांनी काही शाळांचे धान्य तपासले होते. यानंतर तालुका स्तरावर सर्व मुख्याध्यापकांची बैठक पेण शहरात बोलवण्यात आली होती. त्यांच्याकडून धान्यांचे नमुने मागविण्यात आले व हे सर्व नमुने कोकण भवन येथील लॅबमध्ये तपासण्यासाठी पाठविले अहेत. परंतु, धान्य एवढया निकृष्ट दर्जाचे आहे की ते डोळयांनी दिसत असूनही अधिकारी वर्ग कागदी घोडे का नाचवत आहेत, हा मोठा संशोधनाचा विषय आहे.

या विषयी जिल्हा पोषण आहार अधिक्षक राजेंद्र गायकवाड यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही सामानाचे व धान्याचे नमुने लॅबकडे पाठविले आहेत. त्यांच्या रिपोर्टनुसार आम्ही कारवाई करणार आहोत. परंतु, डोळयाला दिसणाऱ्या खराब धान्यांबाबत बोलण्याचे त्यांनी टाळले आहे. तसेच, काही शाळांनी धान्यांचे नमुने देताना ते योग्य प्रकारे साफ करून दिले असल्याचे देखील समजत आहे.

# आणीबाणी म्हणजे काय?

लोकसभेत ओम बिर्ला सभापती झाले. म्हणजे आता ते भाजपचे खासदार उरलेले नाहीत. पण त्यांनी पहिल्याच भाषणात भाजपचे राजकारण पुढे चालवण्याचा प्रयत्न केला. आणीबाणीचा निषेध करणारा ठराव मांडला. काँग्रेसला कोपऱ्यात ढकलण्याचा हा डाव होता. नरेंद्र मोदींच्या सांगण्यावरूनच हा प्रकार झाला असावा. इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये आणीबाणी आणली होती. त्यावेळी विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले. सभा-मोर्चे यांच्यावर बंदी आली. वृत्तपत्रांवर बंधने आली. त्यांच्या कार्यालयांमध्ये मजकूर तपासण्यासाठी सरकारी अधिकारी येऊन बसू लागले. पण याला आता पन्नास वर्षे झाली. आणीबाणी खुद्द इंदिरा गांधींनीच मागे घेतली. देशात निवडणुका घेतल्या. आणीबाणी लागणे ही चूक होती हे मान्य केले. भाजपवाले मात्र त्याचे भांडवल करू पाहतात. पण गेली दहा वर्षे या देशात एक अघोषित आणीबाणीच लागू आहे. इंदिरा गांधींनी राजकीय आरोपांखाली अटक केली होती. नरेंद्र मोदी हे मात्र विरोधकांना भ्रष्टाचाराच्या खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवत आहेत. कोणीही नेता विशेष प्रभावी ठरू लागला की त्याला अशा गुन्ह्यांखाली तुरुंगात टाकले जाते. यूएपीए किंवा निधी अपहार अर्थात मनी लाँडरिंगची कलमे लावली जातात. त्यामुळे न्यायालये जामीन देत नाहीत. कितीही महिने वा वर्षे तुरुंगात डांबणे शक्य होते. आरोपपत्र दाखल होत नाही. प्रत्यक्ष खटला चालवलाच जात नाही. सीबीआय आणि इडी या सरकारी यंत्रणा नुसतेच आरोप करीत राहतात. त्यांना मिडियातून प्रसिध्दी दिली जाते. संबंधित नेता दोषी आहे अशी प्रतिमा तयार होत राहते. विरोधकांचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न आहे. याच रीतीने मोदींच्या विरोधात बोलणारे पत्रकार, वृत्तपत्रे, वाहिन्या, कलाकार अशांना आजवर धमकावण्यात आले आहे. अनेक जण तुरुंगात सडत आहेत. यालाच खरे तर आणीबाणी म्हणतात. इंदिराबाईंनी तिची प्रत्यक्ष घोषणा केली होती. मोदींची आणीबाणी त्याहूनही घातक आहे. कारण, लोकशाहीचा मुखवटा घालून पोलिसी सत्तेचा वरवंटा फिरवला जातो आहे.

### सोरेन यांचा छळ

गेल्या आठवड्यात झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची जामिनावर सुटका झाली. त्यांच्यावर रांचीतील साडेआठ एकर जमीन जबरदस्तीने बळकावल्याचा आरोप होता. सहा महिने ते तुरुंगात होते. ऐन लोकसभा निवडणुकीच्या आधी त्यांना अटक करण्यात आली होती. राज्यातले सोरेन यांच्या पक्षाचे सरकार पाडण्याचाही प्रयत्न होता. पण सोरेन यांच्या बाजूच्या आमदारांनी तो हाणून पाडला. आता सोरेन यांची रांची न्यायालयाने सुटका केली. ती करताना त्यांनी इडीच्या तपासावर ताशेरे मारले. सोरेन यांनी गुन्हा केल्याचे कोणतेही पुरावे प्रथमदर्शनी तरी समोर आलेले नाहीत असे न्यायालय म्हणाले. कोणा एकाच्या फिर्यादीच्या म्हणण्यावरून व अशाच कोणाच्या उडत उडत दिलेल्या साक्षीच्या आधारे सोरेन यांना अटक करणे योग्य नाही असे न्यायालयाचे म्हणणे आहे. सोरेन अपराधी असावेत असा ठोस पुरावा यात दिसत नाही असेही निकालपत्रात म्हटले आहे. अटक होण्यापूर्वी जवळपास एक वर्ष आधीपासून त्यांची चौकशी चालू होती. म्हणजे इडीला पुरावे गोळा करायला भरपूर वेळ होता. तरीही तिला ठोस खटला उभा करता आला नाही. याचाच अर्थ हे सर्व आरोप राजकीय होते. नरेंद्र मोदी व अमित शाह यांच्या राजकारणासाठी हे सर्व घडले. लोकसभा निवडणुकीत भाजपला फायदा व्हावा हा त्यातला हेतू होता. प्रत्यक्षात तोही साध्य झाला नाही. झारखंडमधील तेरापैकी सहा जागा सोरेन यांच्या पक्षाने राखल्या. त्यातील पाच जागा आदिवासींसाठी राखीव होत्या. चारशे पारच्या घोषणेसाठी प्रत्येक राज्यातील एकेक जागा महत्वाची होती. सोरेन यांना तुरुंगात टाकून त्या राज्यात त्याची तजवीज करण्याचा प्रयत्न झाला. पण त्या प्रयत्नाचा पायाच अनैतिक व खोटा होता. त्यामुळे न्यायालयाने भाजपला एक सणसणीत चपराक लगावली. असा खोटा खटला दाखल केल्याबद्दल इडीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी.

### शाह यांचा राजीनामाच हवा

त्याहूनही पुढे जाऊन बोलायचे तर इडीचे बॉस असलेले अमित शाह यांनी राजीनामा द्यायला हवा. पण पत्रकार किंवा कार्यकर्ते कोणीही असे उघडपणे बोलू शकत नाहीत. मोदी व शाह यांनी मिळून जे खोटेपणाचे, सुडाचे आणि पोलिसी कारवायांचे राजकारण चालवले आहे त्यालाच आणीबाणी म्हणतात. विरोधकांनी याविरुध्द ठराव आणला तर लोकसभेत तो मांडू द्यायला ओम बिर्ला परवानगी देणार नाहीत. हाही आणीबाणीचाच प्रकार आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मार्च महिन्यात अटक करण्यात आली. त्यांच्यावर दारु धोरणात पैसे खाल्ल्याचा आरोप आहे. सोरेन यांच्याप्रमाणेच गेल्या दोन वर्षांपासून हे प्रकरण चालू आहे. इतर काही आरोपींना अटक झाली आहे. मात्र केजरीवाल यांना बरोबर निवडणुकीचा मुहूर्त साधून आत टाकण्यात आले. तेलंगणातील कोण्या एका दलालाने दिलेल्या साक्षीवरून ही अटक झाली. केजरीवाल यांची आपण अमुक तारखेला भेट घेतली होती असे त्याचे म्हणणे आहे. या दलालाला माफीचा साक्षीदार बनवण्यात आले. तुरुंगातून सुटून तो आता लोकसभेचा खासदार म्हणून निवडून आला आहे. त्याला प्रचाराची मुभा देण्यात आली. केजरीवाल यांना मात्र प्रचारापुरते बाहेर येण्यासाठी कोर्टाचा दरवाजा खटखटावा लागला. न्यायालयाने त्यांना ही सवलत दिल्यावर खुद्द अमित शाह यांनी न्यायालयावर दोषारोप केला. निवडणूक झाल्यावर केजरीवाल पुन्हा तुरुंगात गेले. त्यानंतर त्यांच्या जामिनाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असल्याच्या दिवशीच सीबीआयने त्यांना पुन्हा त्याच खटल्यात अटक केली. हा सर्व पोरखेळ देशाच्या सर्वोच्च न्यायासनादेखत चालू आहे. न्यायालयाने याची स्वतःहून दखल घेऊन तपास यंत्रणेला धारेवर धरायला हवे होते. केजरीवाल यांना ऐन निवडणुकीच्या काळात अटक करण्यामागचा हेतू काय असा सवाल न्यायालयाने त्यांना हंगामी जामीन देताना केला होता. तरीही त्यांना याच प्रकरणात पुन्हा अटक करताना सीबीआयला भीती वाटली नाही. सत्ताधारी आणि पोलिस यांनी घातलेला हा हैदोस म्हणजेच खरी आणीबाणी आहे. बिर्ला, शाह व मोदी हे नेते या राजवटीचे सैतानी चेहरे आहेत.

**विचार**

# मानवनिर्मित ‘प्लास्टिक’ चा माणूस ठरतोय बळी!

**प्रीतम गेडाम**

पृथ्वीवर, मानवाने त्याच्या सोयीसाठी नवनवीन शोध लावले, परंतु नैसर्गिक संसाधनांचा अवाजवी वापर केला गेला. आज मानव स्वतःच्या सुखासाठी निसर्गाशी खेळ करून पृथ्वीचा नाश करण्यावर बेतला आहे. जेव्हाकी पृथ्वीवरील मानवी अस्तित्व तसेच संपूर्ण जीव सृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे, झपाट्याने बदलणारे हवामान हे मानवनिर्मित कारणांचा परिणाम आहे. अमेरिकेच्या स्वतंत्र संशोधन संस्थेच्या ‘‘हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट’’ च्या अहवालात म्हटले आहे की २०२१ मध्ये ८१ लाख मृत्यू वायू प्रदूषणामुळे झाले, भारतात २१ लाख आणि चीनमध्ये २३ लाख मृत्यूंना वायू प्रदूषण कारणीभूत आहे, मृत्यूचा हा आकडा खूप जास्त आहे. वायू प्रदूषणाबरोबरच जलप्रदूषण, प्लास्टिक प्रदूषण, माती प्रदूषण, ई-कचरा, जैव-वैद्यकीय कचरा, घातक रसायनांचा वापर यामुळे जीवघेण्या आजारांमुळे दरवर्षी लाखो लोकांचा अकाली मृत्यू होत आहे. प्रदूषणामुळे प्राणी, पक्षी, वन्यजीव आणि समुद्री जीव झपाट्याने नाहीसे होत आहेत. पृथ्वीवरील प्लॅस्टिकचे प्रदूषण इतके वाढले आहे की आज संपूर्ण जगात प्लास्टिकवर बंदी घातली तरी हजार वर्षे त्याचे अस्तित्व पर्यावरणात दिसून येईल. आपल्याला हे जाणून आश्चर्य वाटेल की, आजच्या वर्तमान युगात आपण रोज प्लास्टिक खातो-पितो आणि प्लास्टिक मिश्रित ऑक्सिजन घेतो. जागतिक स्तरावर, दरवर्षी प्रत्येक व्यक्ती संभाव्यत ११८४५ ते १९३२०० मायक्रोप्लास्टिक्स शरीरात घेते, ७.७ ग्रॅम ते २८७ ग्रॅम प्रति व्यक्ती, ज्याचा सर्वात मोठा स्त्रोत म्हणजे आपले पिण्याचे पाणी आहे.

क्रिश्चियन चैरिटी समूह टीअरफंडने केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की विकसनशील देशांमध्ये प्लास्टिकचा कचरा दर ३० सेकंदाला एक मृत्यूसाठी जबाबदार आहे. संशोधकांना असे आढळून आले की, प्लास्टिक कचऱ्याच्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे दरवर्षी चार लाख ते दहा लाख लोक कर्करोगासारख्या घातक आजाराने मरतात. प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे दरवर्षी १०० दशलक्ष समुद्री जीव मरतात, प्लास्टिकच्या वस्तूंमध्ये अडकल्यामुळे दरवर्षी १००००० समुद्री जीव प्राण गमावतात. गरम पदार्थांसाठी प्लास्टिकचा वापर करणे हे विषासारखे आहे, कारण प्लास्टिकचा गरम पदार्थाच्या संपर्कात येताच प्लास्टिक विषारी रसायने सोडते, जे अन्नात मिसळते आणि ते अन्नपदार्थ खाल्ल्याने मनुष्य जीवघेण्या आजारांना बळी पडतो, त्यामुळे



प्लास्टिक प्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये सातत्याने वाढ होत आहे. प्लॅस्टिकमधील विषारी रसायने मानवी शरीरातील संप्रेरक क्रियाकलाप बदलू शकतात, प्लास्टिकमध्ये असलेले विघटनशील रसायने वंध्यत्व, लठ्ठपणा, मधुमेह, प्रोस्टेट किंवा स्तनाचा कर्करोग, थायरॉईड समस्या, हृदयरोग आणि पक्षाघाताचा धोका वाढवतात. प्लॅस्टिकच्या पिशव्या फोटोडिग्रेड होण्यासाठी सुमारे ३०० वर्षे लागतात आणि काही प्लास्टिकला हजार वर्षे लागतात. ते लहान विषारी कणांमध्ये मोडतात जे माती आणि जलमार्ग प्रदूषित करतात आणि जेव्हा प्राणी, पक्षी किंवा सागरीजीव चुकून हे प्लास्टिक खातात तेव्हा ते अन्न साखळीत प्रवेश करतात. प्लॅस्टिक जाळून ते नष्ट करता येत नाही, कारण जळल्यावर ते विषारी वायू वातावरणात सोडतात ज्यामुळे वायू प्रदूषण होते.

जनजागृती करण्यासाठी दरवर्षी ३ जुलै रोजी ‘‘आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस’’ जगभरात साजरा केला जातो. या वर्षीची थीम ‘‘व्यक्ती, व्यवसाय आणि संघटनांना प्लास्टिकच्या इतर शाश्वत पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करा’’ आहे. प्लास्टिकचा वापर आणि कचरा कमी करण्यासाठी धोरणात्मक बदल आणि पद्धतशीर उपायांवर भर द्या. प्लास्टिक पिशव्या पेट्रोलियम पदार्थांपासून बनवल्या जातात, प्लास्टिकच्या अन्न साठवणुकीच्या पॅकेजमध्ये विषारी रसायने असतात, प्लास्टिक उत्पादनादरम्यान विषारी रसायने सोडली जातात. २०५० पर्यंत महासागरांमध्ये माशांपेक्षा प्लास्टिकचा कचरा जास्त असेल. जगभरात दरवर्षी सुमारे ५०० अब्ज प्लास्टिक पिशव्या वापरल्या जातात, ह्या खूप जास्त पिशव्या आहेत. जगभरात प्रत्येक सेकंदाला १६०००० प्लास्टिक पिशव्या वापरल्या जातात, ज्यांचे आयुष्य अंदाजे १२ ते २५ मिनिटे असते. जगभरात दर मिनिटाला जवळपास १० लाख पाणी, थंड पेय प्लास्टिक बाटल्या विकल्या जातात, प्यू चॅरिटेबल ट्रस्ट २०२२ च्या अभ्यासानुसार, दरवर्षी ११ दशलक्ष मेट्रिक टन पेक्षा जास्त प्लास्टिक समुद्रात जाते, जे पाण्यात मिसळते आणि अन्न साखळी विस्कळीत करते. ईए अहवालानुसार, एमडब्ल्यूआई मध्ये भारत चौथ्या क्रमांकावर आहे, जिथे निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी ९८.५५ टक्के कचऱ्याचे चुकीचे व्यवस्थापन केले जाते. गेल्या पाच वर्षांत भारतात प्लास्टिक कचऱ्याचे उत्पादन चौपट झाले आहे. सरकार म्हणते की देशातील ६०% प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर केला जातो, जेव्हाकी सीपीसीबी डेटावर आधारित सीएसई डेटानुसार, भारत त्याच्या केवळ १२% प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करू शकतो.

भारतात सिंगल यूज प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे, अनेकवेळा प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महापालिका दुकाने व कारखान्यांवर छापे टाकून प्लास्टिक पिशव्यांचा अवैध माल जप्त करतात. मात्र बंदी असतानाही प्लास्टिक पिशव्यांचा अवैध धंदा आणि वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. दुकानदारांनी नकार देऊनही ग्राहकही प्लास्टिक पिशव्यांची मागणी करतात, अशा लोकांच्या मूर्खपणाचा फटका इतर लोकांना आणि पर्यावरणाला सहन करावा लागतो, त्यामुळे निष्पाप जीवांना आपला प्राण गमवावा लागतो. रस्त्यावर, दुकानांवर, रस्त्यावरील विक्रेते, किराणा दुकाने, लहान हॉटेल्स, भाजी विक्रेते, खाद्यपदार्थ विक्रेते, छोटे दुकानदार यांच्याकडून बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर आपण सहजच अनेकदा पाहतो. पिशव्या वापरल्या जात आहेत, म्हणजे अशा अवैध प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन सुरू आहे.

लोकांना प्लास्टिकचा अतिवापर करण्याची सवय लागली आहे. पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व आणि निसर्ग वाचवायचे असेल तर प्लास्टिकचा वापर त्वरित थांबवावा लागेल. प्लास्टिकला इतर पर्यायांचे अनुकरण करून पर्यावरणाचे रक्षण करावे लागेल. आळस आणि स्वार्थ सोडून कापडी किंवा कागदी पिशव्या वापरा, पैशापेक्षा निसर्गाला प्राधान्य द्या. कायदे आणि सरकारी धोरण नियमांचे पालन करा. कचरा निर्माण होणार नाही किंवा कमी होणार, याची काळजी घ्या. प्रत्येक वस्तूचा पुनर्वापर करण्याचा विचार करा. प्लास्टिक पॅक केलेले खाद्यपदार्थ खरेदी करणे टाळा. एकेरी वापरण्यायोग्य डिस्पोजेबल प्लास्टिकला नकार द्या. प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या बाहेर विकत घेण्याऐवजी घरूनच पाण्याची स्टीलची बाटली घेऊन निघा. २०-२५ वर्षांपूर्वी जेव्हा अन्न पॅकेजिंगचा ट्रेंड नव्हता, किराणा दुकानात खाद्यतेल घेण्यासाठी आपण घरून केटली आणि भांडे घेऊन जायचो कारण त्यावेळी तेलाची पाकिटे येत नसत. त्याकाळी प्लास्टिकच्या पिशव्या उपलब्ध नसल्यामुळे ते वर्तमानपत्राच्या टाकाऊ कागदात किराणा सामान मिळायचे, घरी काचेच्या बाटलीत किंवा कुठल्यातरी भांड्यात दूध आणले जायचे. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की तुम्ही शोधले तर तुम्हाला शंभर सबबी सापडतील पण मेहनतीने सर्व काही शक्य आहे. २००८ मध्ये, रवांडा हा छोटा गरीब देश जगातील पहिला देश बनला, ज्याने एकेरी वापराच्या प्लास्टिक पिशव्या आणि प्लास्टिक बाटल्यांवर बंदी घातली, या देशात प्लास्टिकच्या वस्तूसह पकडल्यास सहा महिने तुरुंगवास भोगावा लागतो. १९९८ मध्ये डिस्पोजेबल प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालणारे सिक्कीम हे पहिले भारतीय राज्य बनले. २०१६ मध्ये सिक्कीमने दोन मोठे निर्णय घेतले, सरकारी कार्यालये आणि सरकारी कार्यक्रमात पॅकेज्ड पिण्याचे पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली. केरळमधील कन्नूरमध्ये २५ लाखांहून अधिक लोकांनी प्लास्टिक वापरणे बंद केले, जेणेकरून दक्षिण भारतातील पहिला प्लास्टिकमुक्त जिल्हा होऊ शकेल. एका वर्षात कन्नूर जिल्ह्यात ४० लाख प्लास्टिक कॅरीबॅग कमी झाल्या. दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील सादीवाडा या दुर्गम गावात ग्रामपंचायत प्रमुखांनी पर्यावरण वाचवण्यासाठी प्लास्टिकमुक्त गाव म्हणून ओळखले जाणारे पहिले गाव बनवण्याचा अनोखा उपक्रम सुरू केला. आसाममधील एका मॉडेल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शाळेची फी म्हणून दर आठवड्याला २५ प्लास्टिक कचरा गोळा करून आणावा लागतो, जेणेकरून पर्यावरण सुरक्षित राहील. मेघालयातील मावलिनॉन्ग गावाजवळ असलेले डावकी तलाव २००३ मध्ये आशियातील सर्वात स्वच्छ गाव म्हणून घोषित करण्यात आले. स्वच्छतेबाबत अत्यंत जागरूक असलेल्या ग्रामस्थांनी प्लास्टिक वापरावर बंदी घातली आहे. जानेवारी २०२० मध्ये, केरळमधील कुमारकोम हे पहिले प्लास्टिकमुक्त पर्यटन स्थळ बनले. प्लास्टिकमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून पुढाकार घेतला पाहिजे, जेणेकरून येणाऱ्या पिढ्यांसाठी हा सुंदर निसर्ग स्वच्छ हिरवागार राहील.

**आजकाल**

# पावसाळी पर्यटन -जीव धोक्यात घालू नका

**डॉ. विनय काटे**

२००५ साली मिरज मेडिकलमध्ये असताना माझी वर्गमैत्रीण होती मुंबईची चित्रा गुप्ता. माझा आणि तिचा रोल नंबर आडनावामुळे शेजारी होता म्हणून वर्गापासून परिक्षेपर्यंत सगळीकडे ती शेजारी दिसायची. पावसाळ्यात वर्गातल्या काही मित्रमैत्रिणीसोबत चित्रा ठोसेघरचा धबधबा पाहायला गेली. तिथे छोट्याश्या डोहात ती पोहायला येत नसताना उतरली आणि होत्याचं नव्हतं झालं. डोहात की प्रवाहात ती बुडाली आणि नंतर दुसऱ्या दिवशी मिळाले तिचे प्रेत. मला ही बातमी कळली त्यावेळी मी गोव्यात होतो आणि त्यावेळी मला अश्रू आवरले नाहीत. चित्राच्या आईवडिलांनी तिच्या आठवणीत त्या धबधब्या शेजारी लावलेला बोर्ड आजही आहे.



चित्राच्या अपघातानंतर आमच्या कॉलेजने वर्षभर सहली बंद केल्या. त्यानंतर ज्युनिअर बॅचच्या मुलांनी खुप आग्रह करून एका बीचवर (बहुदा गोव्यात) सहल आयोजित करण्यासाठी कॉलेज प्रशासनाला भाग पाडले. त्या सहलीत मुलेमुली बीचवर पाण्यात खेळत असताना एका मोठ्या लाटेच्या फटक्यात सहासात मुले पाण्यात ओढली गेली. पुढच्या लाटेत त्यातली काही मुले बाहेर आली पण दोघेजण कमनशिबी ठरले आणि त्यांचा त्यातच अंत झाला. ही बातमी जेव्हा आम्हाला कळली तेव्हा मी आमच्या डीन सरांच्या बंगल्यावर त्यांच्यासोबत होतो. त्यावेळी मी डीन सरांच्या डोळ्यात पाणी पाहिले होते.

गेल्या आठवड्यात लोणावळ्यात अख्खं कुटुंब वाहून जाताना, भुशी धरणात एक पट्टीचा खेळाडू बुडून वाहत जाताना जेव्हा व्हिडिओ पाहिले तेव्हा जुन्या वाईट आठवणी परत एकदा जाग्या झाल्या. पावसाळ्यात समुद्र, धबधबे, ओढे, नद्या ही निसर्गाची रूपे मोहक वाटत असली तरी ती प्रत्यक्षात अक्राळविक्राळ असतात हे वैज्ञानिक सत्य बहुतांश लोकांना माहीत नसते. पाण्याचा अगदी उथळ वाटणारा प्रवाह जेव्हा पुलावरून किंवा रस्त्यावरून वाहतो तेव्हा तो गाडीची चाके आणि रस्ता यातले घर्षण संपवून टाकतो आणि गाडी अगदी कमी वेगात असतानाही पुलावरून, रस्त्यावरून अलगद खाली घसरत जाऊन मोठे अपघात होतात. एक्सप्रेस महामार्गावर स्पीड लिमिट ट्रॅफिकचे चलन काढण्यासाठी नाही तर तुमचा जीव वाचवण्यासाठी आहे हे समजून घ्या!

नदीत, धबधब्यात, ओढ्यात अगदी गुडघाभर पाणी असताना आपण खूप आनंदाने त्यात उतरतो, पण जेव्हा वर डोंगरात पाऊस सुरू असतो तेव्हा क्षणात येतो आणि आपल्याला वाहवून नेत संपवून टाकतो. धबधब्याखाली अंघोळ करताना जेव्हा पाण्याचा प्रवाह नव्याने सुरू होतो किंवा अचानक वाढतो तेव्हा वरून दगड निसटून खाली येतात आणि गुरुत्वाकर्षण आणि पाण्याच्या प्रवाहाच्या वेगासोबत ते अजून घातक बनत आपल्या डोक्याची कवटी फोडू शकतात... अगदी छोटे दगडसुद्धा! त्यामुळे कुठेही थेट वरून पडणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात खाली उभे राहणे हे मृत्यूला आमंत्रण आहे! पट्टीचे पोहणारे लोकही मध्ये पोहू शकत नाहीत!

तेव्हा सर्वांना विनंती आहे की पर्यटनाच्या, साहसी ट्रेकच्या, रोमांसच्या, थ्रीलच्या धुंदीत निसर्गाशी पंगा घेवू नका... निसर्ग च्या नियमांनी चालतो, आपल्या भावनांना तो किंमत देत नाही. भीती वाटणे हे आपले जीव वाचवणारे नैसर्गिक डिफेन्स तंत्र आहे. भीती वाटण्याची लाज वाटू देवू नका. निसर्गाच्या बाबतीत ‘‘डर के आगे जीत’’ नसते... मौत असते! स्वतःही समजून घ्या आणि आपल्या जिवलग लोकांना समजवा!!

(साभार)

**लोकसंसद**

### भटक्या श्वानांची समस्या

२०१४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार मुंबईत ९५ हजार भटके कुत्रे होते. गेल्या दहा वर्षांत ती संख्या वाढून सुमारे एक लाख ६० हजारावर पोहोचली असल्याचा पालिका प्रशासनाचा अंदाज आहे. दिवसेंदिवस भटक्या श्वानांची संख्या वाढत असल्यामुळे मुंबईत श्वान दंशाच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. एकीकडे पालिकेने सुमारे २५ हजार भटक्या कुत्र्यांचे रेबीज लसीकरण केल्याचा दावा केला असला तरी गेल्या तीन वर्षांमध्ये मुंबईत ३ हजार ५०८ श्वान दंशाच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबई शहराच्या गल्लीबोळातून भटक्या कुत्र्यांच्या अनेक टोळ्या निर्माण झाल्या असून पहाटे प्रभात फेरीला जाणाऱ्या नागरिकांवर, दुचाकीस्वारांवर, सकाळी शाळेत जाणाऱ्या लहान शालेय विद्यार्थ्यांवर, कचरा वेचणाऱ्यांवर, भाजीवाल्यांवर हे भटके कुत्रे धावून जातात. प्रसंगी चावा घेतात. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाकडून शहरातील श्वानांची संख्या वाढू नये म्हणून अधिकाधिक भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे, कुत्र्यांचा वावर असलेल्या कचरा कुंड्यांची नियमितपणे साफसफाई करणे, इत्यादी उपाय तातडीने करणे गरजेचे आहे. तसेच वेळी अवेळी भटक्या कुत्र्यांना खायला घालण्याऱ्या श्वानप्रेमींना आवरणे गरजेचे आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**३ जुलै**

**१३५०:-** शके १२७२ आषाढ वद्य १३ या दिवशी विठ्ठल भक्त संत नामदेव समाधिस्त झाले. नामदेवांची अभंगरचना अतिशय उत्कट व भाषा कमालीची साधी आहे. ‘देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावों ।। अशी त्यांनी वाणी प्रासादिक आहे. संत नामदेवांनी हिंदीतही रचना केली. शिखांच्या ग्रंथसाहेबात त्यांनी एकूण ६१ कवने समाविष्ठ केली आहे. **१८३८:-** प्रार्थना समाजाचे एक संस्थापक व वृत्तपत्र संपादन, लेखक नारायण महादेव तथा मामा परमानंद यांचा जन्म. **१८८६ :-**अध्यात्मिक व तत्त्वज्ञानपर ग्रंथाचे जागतिक किर्तीचे लेखक रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचा जन्म. **१९०२ :-** लेखक, प्राध्यापक, प्राचार्य डॉ. दत्तात्रय हरी अग्निहोत्री यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत ‘अंतरिक्ष प्रवास’ ह्यातून विमान विद्येची माहिती, ‘स्मृतिकुंज’ हे अनुवादित आत्मचरित्र, ‘मराठी वर्णोच्चार विकास’ हा प्रबंध, ‘लंकेत रामयोग संगम’ मधून लंकेतील प्रेक्षणीय स्थळांची माहिती, याशिवाय ‘महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान’, ‘अभिनव मराठी’ हा मराठी शब्दकोश, अशी साहित्य संपदा. यांचे २२ नोव्हेंबर १९९० रोजी निधन झाले. **१९०९:-** स्वातंत्र्यसेनानी, कायदातज्ञ या विषयावरील लेखक न्या वि. म. उर्फ भाऊसाहेब तारकुंडे यांचा जन्म. **१९१४:-** नाटककार, कलामीमांसक आणि समीक्षक दत्ताराम गणेश गोडसे यांचा जन्म. ‘पोत’ हे त्यांचे पहिले पुस्तक. ‘शक्तिसौष्ठव’, ‘मातावळ’,‘उर्जायन’ ही त्यांची कला व साहित्य यांची ऐतिहासिक दृष्टीकोनातून मीमांसा करणारी पुस्तके तसेच ‘मस्तानी व दफ्तनी’ हे इतिहास संशोधनपर लेखांचे संग्रह आणि ‘राजयाचा पुत्र अपराधी देखा’, ‘काळगंगेच्या काठी’, ‘संभाजीचे भूत ही नाटके त्यांनी लिहिली. **१९२२:-** लेखक, इतिहासाचे अभ्यासक, मराठी विवकोशाचे संपादक प्रा. सदाशिव न. आठवले यांचा जन्म. ‘अर्धपुतळा’,‘ऐक माणसा तुझी कहाणी’ ह्या कादंबऱ्या. ‘असे पुरुष अशा बायका’ ,‘कसे जगावे कसे मरावे’ मिळून आठ कथा, ‘कागदी पुंग्या’ हे काव्य, ‘हा व्यवहार आहे’ हे नाटक यासह ‘इतिहासाच्या क्षेत्रात’,‘इतिहासाचे तत्वज्ञान’,‘चार्वाक : इतिहास व तत्वज्ञान’,‘नाना फडणीस आणि इंग्रज’,‘मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास’,‘शिवाजी आणि शिवयुग’ ही ऐतिहासिक पुस्तके त्यांनी लिहिली आहे. **१९४५:-** लेखक प्रा. डॉ. आनंद बाळू पाटील यांचा जन्म. ‘कागूद आणि सावली’ या दोन लघुकांदबऱ्यासह ‘इच्छामरण’ ही कादंबरी तसेच ‘फुगंडया’,‘दावण’,‘फेरा’,‘खंडणी’ हे कथासंग्रह तसेच ‘पाटलांची परदेशवारी’ हे प्रवासवर्णन याशिवाय त्यांच्या तौलानिक साहित्यात मराठी नाटकावरील इंग्रजीचा प्रभाव’, ‘तौलानिक साहित्य : नवे सिध्दांत आणि उपयोजन’, ‘तुळव’ हा तौलानिक निबंध आणि काही अनुवादातील साहित्य त्यामध्ये ‘वैदिक साहित्यातील धर्माचा उदय आणि विकास’,‘उरुस’ सह इंग्रजीतूनही त्यांनी लिखाण केले आहे. **१९४५:-** संत ग्यानबा जैराम झोडे तथा ज्ञानानंद यांचा जन्म. इयत्ता चवथी उत्तीर्ण असलेल्या ज्ञानानंद यांचा ‘सुबोध’ हा भजनसंग्रह तर ‘विचारप्रवाह’ हा अध्यात्मिक ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९४९:-** कवी गोविंदराव सोनबाजी नगराळे यांचा जन्म. ह्यांचे ‘स्पंदन’,‘आव्हान समतचे’,‘धर्मभान’, ‘अर्पण’ हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९५२:-** लेखक डॉ. निळकंठ गोपाळ मेंढे यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत ‘आकाशी आणि आक्रोश’ हे काव्यसंग्रह आणि ‘उध्वांक’ धर्मशास्त्रीय कथासंग्रह प्रसिध्द. याशिवाय डॉ.मेंढे यांचे विविध नियतकालिक शोधनिबंध, लेख, समीक्षक लिहिले आहेत. **१९५७:-** ज्येष्ठ साहित्यिक, चारोळीकार, पक्षीमित्र, कवी, पत्रलेखक, निसर्ग अभ्यासक अनिल दाभाडे यांचा जन्म. आतापर्यंत ६००० हून अधिक चारोळया, १००० हून अधिक कविता व ४५० हून अधिक लेख हे गड, किल्ले, लेण्या, प्राचीन मंदिरे तसेच विविध सागर आदी विषयांवर त्यांनी विविध वृत्तपत्रे, साप्ताहिक व मासिकातून लिहिलेत. **१९७१:-** कवियत्री सपना अशोक बनसोड यांचा जन्म. ‘खंत’ हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९७१:-**ज्योतिष शास्त्राचे जाणकार, पंचांगकर्ते लेखक कृष्णाजी विठ्ठल सोमण यांचे निधन. ‘सुलभ ज्योतिष शास्त्र’ या पुस्तकासह ‘हिंदूचे धार्मिक विधी व पूजा पाठ संदर्भात’ त्यांनी पुस्तक लिहिले. **१९९४:-** नाटककार वसंत वैकुंठ कामत यांचे निधन. हिरोशिमावर टाकलेल्या अणुबॉम्बवर ‘सूर्यकोटिसमप्रभा’ हे नाटक लिहिले. ‘मा निषाद’ हे त्यांचे नाटक मानसिक ताणतणावांवर आधारलेले होते. त्यांचे मराठीतील पहिलेच रहस्यमय नाटक ‘फोन नं.३३३३३’. हे रमेश देव व सीमा देव यांच्या अभिनयामुळे गाजले. **२००३:-** कथालेखिका, कांदबरीकार आणि बालसाहित्यिक स्नेहलता दत्तात्रय दसनूरकर यांचे निधन. ‘स्वर्ग तुच्छ भासतो’, ‘प्रिया’, ‘धडा’ मिळून त्यांचे ६४ कथासंग्रह प्रकाशित. ‘कलंकिता मी कशी’,‘अज्ञात शत्रू’ या कादंबऱ्या, ‘मन सुखाची ठेव’, ‘कुत्र्याचे शेपूट’ हे त्यांचे ललित गद्यसंग्रह आणि ‘ज्ञानदेवे घातला पाया’, ‘कट्टी’ ही बालसाहित्याची पुस्तके त्यांच्या नावावर जमा आहेत. **२०१३:-** लेखक, दिग्दर्शक, अभिनय, गायन, नाट्यनिर्मिती अशा नाटकाच्या सगळ्या प्रांतास मुशाफिरी करणारे सतीश तारे यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ जुलै

१) श्रीम. नलिनी पांडुरंग लिमये
०३-०७-१९४४, अलिबाग

२) श्री. किशोर दत्तात्रेय खोत,
०३-०७-१९५८, वेश्वी, अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# पुढाऱ्यांना गाव पातळीवरील निवडणुकीचे वेध!

## डिसेंबर अखेरपर्यंत २४० ग्रामपंचायतींची मुदत संपणार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील तब्बल २४० ग्रामपंचायतींची मुदत या वर्षाच्या डिसेंबर अखेरपर्यंत संपणार आहे. मात्र, लोकसभा निवडणूक कार्यक्रमामुळे या ठिकाणी निवडणुका झाल्या नसल्याने ग्रामपातळीवरील नेते आणि कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत निवडणुकीचे वेध लागले आहेत. त्यासाठी त्यांनी जोरदार तयारीही केली आहे.

२०२४ या वर्षाचे पहिले सहा महिने लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीने ढवळून निघाले. आता पावसाळा सुरू असतानाच ग्रामपंचायत निवडणुकांचे वेध लागले आहेत. १ जानेवारीपासून ३१ डिसेंबर २०२४ दरम्यान जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींची मुदत संपत आहे. त्यात अलिबाग तालुक्यात ३४, पेण १८, उरण ८, मुरुड ४, कर्जत ३०, खालापूर ३, रोहा २६, तळा १८, म्हसळा ११, सुधागड ६, पनवेल १५, माणगाव २१, महाड ३० आणि श्रीवर्धन १६ अशा १४ तालुक्यांतील एकूण २४० ग्रामपंचायतींचा समावेश आहे.



**निवडणुकांना मुहूर्त कधी?**

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणूक झाली नसल्याने तेथे प्रशासक राजवट आहे. जिल्ह्यातील २४० पैकी बहुतांश ग्रामपंचायतींवर प्रशासक आहेत. तर उर्वरित ग्रामपंचायतींवर पुढील काळात प्रशासक बसण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत ग्रामपंचायत निवडणुकांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे गावा-गावांतील नेते आणि कार्यकर्त्यांनी सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य होण्यासाठी आधीपासून सुरुवात केलेली आहे. आता पावसाळ्यात ग्रामपंचायत निवडणुका घेणे शक्य नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या सप्टेंबरअखेर किंवा विधानसभा निवडणुकांनंतरच या निवडणुकांना मुहूर्त लागेल असे सांगितले जात आहे.

## तिकीट तपासनिस विजय लांडगे यांनी दोघांचे प्राण वाचले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

उपनगरीय लोकलमधून प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. तिकीट तपासनीस विजय लांडगे यांनी प्रसंगावधान दाखवल्याने हे शक्य झाले आहे.



माथेरान शटल रेल्वेसाठी सेवा बजावत असेलेले तिकीट तपासणीस विजय लांडगे हे कामावर जाण्यासाठी दिनांक २४ जून रोजी बदलापुरहून नेरळकडे निघाले होते. १० वाजून ३८ मिनीटांनी ते सहकारी तिकीट तपासणीस जोशी यांच्यासह नेरळ स्टेशनवर उतरले. नेहमी प्रमाणे ते दोघेही स्टेशनच्या बाहेर जाऊन टॅक्सीने माथेरानला जाण्या करता नेरळ स्टेशनहून निघाले दरम्यानच्या काळात फलाटाहून गाडी सुटली. परंतु, चालत्या गाडीतून एक प्रवासी आपल्या दोन लहान मुलांना घेऊन गाडीतून उतरत असल्याचे विजय लांडगे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी प्रसंगावधान राखून जिवाची पर्वा न करता या दोन मुलांसह त्यांच्या पालकांना गाडीतून बाहेर खेचले. त्यामुळे होणारी अघटित घटना टळली. याबाबत लांडगे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. विजय लांडगे यांनी या आधी सुध्दा माथेरान मिनिट्रेनमध्ये अनेक प्रवाशांच्या विसरलेल्या वस्तु परत केल्या आहेत. त्यांनी नेहमीच आपल्या प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले आहे.

## श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्यावतीने रक्तदान शिबीर

**पाली/गोमाशी :** श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली व रुधिरसेतू सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भक्त निवास क्रमांक १ येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

श्री बल्लाळेश्वर देवस्थान व रुधिरसेतू सेवा संस्था यांच्या आवाहनाला ९८ रक्तदात्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. या रक्तदात्यांना रुधिरसेतू सेवा संस्थेच्यावतीने एक कापडी पिशवी टिफीन डबा भेट म्हणून देण्यात आले.

काही नागरिक ठराविक अंतराने रतक्तदान करत असतात. २५ व त्यापेक्षा जास्त रक्तदान करणाऱ्या नागरिकांना रुधिरसेतू सेवा संस्थेच्यावतीने सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री बल्लाळेश्वर देवस्थानचे विश्वस्त मंडळ व कर्मचारी तसेच रुधिरसेतू सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परीश्रम घेतले.



## कृषी दिनानिमित्त नांदगाव हायस्कूल येथे वृक्षारोपण

**। मुरुड । वार्ताहर ।**

कृषी दिनाचे औचित्य साधून नांदगाव हायस्कूल येथे वृक्षरोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाळेच्या आवारात चिंच, आवळा, बहावा, निलगिरी आदी वृक्षाचे रोपण करण्यात आले.शिक्षक वृंद यांच्यासोबत शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व पटवून सांगताना पावसाचे प्रमाण वाढवण्यासाठी जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचा सल्ला दिला. सदरील वृक्ष रोपण कार्यक्रमासाठी नांदगाव हायस्कूल मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, सागर राऊत, महेश वाडकर, राहील घलटे, निशा बिरवाडकर, दत्ता खुळपे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## सुरेश अडसूळे यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांढरोली तालुका खालापूर जिल्हा रायगड शाळेचे मुख्याध्यापक सुरेश गंगाराम अडसुळे यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ खालापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व खालापूर केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानाने संपन्न झाला आहे.



शिक्षण क्षेत्रातील ३८ वर्षाच्या अथक सेवेनंतर सुरेश गंगाराम अडसुळे हे सेवेतून निवृत्त झाले. त्या निमित्ताने शिक्षक परिवाराच्यावतीने त्यांचा सेवापूर्ती सत्कारसमारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय खडतर परिश्रमातून उभं राहिलेले हे व्यक्तिमत्व त्यांच्याकडे तालुक्यातील एक शांत, संयमी व कर्तव्यदक्ष शिक्षक मार्गदर्शक म्हणून पाहिले जाते. ते स्वतः कायद्याचे अभ्यासक असून कायम मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावली आहे. सामाजिक लढ्यातही आग्रही भूमिका त्यांनी घेतली आहे.सेवापूर्तीच्या सर्वांनी भरभरून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जयश्री सुर्वे, विषय शिक्षिका कांढरोली शाळा यांनी केले. आभार उस्मान सैयद यांनी मानले.

# जिल्ह्यात हत्तीरोगाचे २२९ रुग्ण

**। रायगड । प्रतिनिधी ।**

हत्तीरोगाचे रायगड जिल्ह्यात २२९ रुग्ण आहेत. हा आजार समूळ नष्ट करण्यासाठी अनेक मोहिमा राबवून तो जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. अलिबाग आणि पनवेल तालुक्यात त्याचे सर्वाधिक रुग्ण आहेत.

क्युलेक्स प्रजातीच्या डासांपासून हत्तीरोग हा आजार होतो. सामाजिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आजार आहे. यामध्ये रुग्णांच्या पायावर सूज येऊन हालचालींवर एका प्रकारचे निर्बंध येतात. इतरांच्या मदतीशिवाय हे रुग्ण हालचाल करू शकत नाही. पायावर सूज येणे, ताप येणे, पाय लालबुंद होणे, पायाच्या दोन बोटांमध्ये चिखल्या आजाराप्रमाणे जखमा होणे अशी टप्प्याने रुग्णात लक्षणे दिसून येतात. पायाच्या सुजेवरून तीव्रता तपासून दिव्यांग प्रमाणपत्र वितरित करण्याचे आदेश राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या संचालकांनी दिले आहेत.

राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या हत्तीरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत नुकतेच सर्वेक्षण करण्यात आले आहे.

**हत्तीरोगाची लक्षणे**

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, हत्तीरोगाच्या लक्षणाच्या चार अवस्था असतात. जंतू शरीरात शिरकाव केल्यानंतर आजाराची लक्षणे दिसून येऊ शकतात. लक्षणविरहित किंवा वाहक अवस्थेमध्ये रुग्णाच्या रात्री घेतलेल्या रक्ताच्या नमुन्यात मायक्रो फायलेरिया आढळून येतात. मात्र, रुग्णांमध्ये कोणतीही लक्षणे आढळून येत नाहीत. तीव्र लक्षण अवस्थेत ताप येतो, लसिकाग्रंथींचा दाह सुरू होतो.

**रायगडमधील हत्तीरोग रुग्णांची संख्या**

अलिबाग- ५६, उरण- ३१, पनवेल- ४७, कर्जत- ७, खालापूर- ९, सुधागड- ५, पेण- २८, मुरुड- १२, रोहा- ११, माणगाव- १२, तळा- १, म्हसळा- १, श्रीवर्धन- १, महाड- ४, पोलादपूर- ४, एकूण- २२९

वरिष्ठांच्या सूचनांप्रमाणे हत्तीरोगाच्या रुग्णांची जिल्हा रुग्णालयात तपासणी करून ज्याचे अपंगत्व ४० टक्के पेक्षा जास्त आहे. त्यांना दिव्यांगांचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच हत्तीरोग जिल्ह्यातून हद्दपार व्हावा, यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
-राजाराम भोसले, जिल्हा हिवताप अधिकारी, रायगड

## खोपड-चांदके रस्त्यावर झाड कोसळले

**पोलादपूर :** आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना घडल्या आहेत. रविवारी सकाळी पोलादपूर तालुक्यातील खोपड-चांदके गावाकडे जाणाऱ्या मार्गावर झाड पडल्यामुळे एसटी व इतर चार वाहने जवळपास तासभर खोळंबली. गावातील मोरगिरी येथील लोणचे कारखान्याजवळ दोन दिवसांपूर्वी झाड पडले होते. तर जूनच्या दुसऱ्या सप्ताहात तालुक्यातील चिरेखिंड येथे झाडाच्या फांद्या रस्त्यावर पडल्या होत्या.

# रेवस येथे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवा

## कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता अलिबाग यांना ग्रामस्थांकडून निवेदन सादर

**। खारेपाट । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील रेवस कोळीवाडा येथे विजपुरवठा सतत खंडित होत असल्याने नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबात कार्यकारी अभियंता शैलेश कुमार सिंगव उपकार्यकारी अभियंता कमलाकर अंबाडे अलिबाग व उपअभियंता बेलपाडा- रेवस यांनाही रेवस कोळीवाडा ग्रामस्थांतर्फे निवेदन सादर करण्यात आले. जुना ट्रान्सफॉर्मर वीसवर्षांपुर्वी बसविण्यात आलेला होता.




परंतु आता विज कनेक्शन वाढल्यामुळे सन २०२४ ते२०२५ या वर्षात ६०० मीटर पर्यंत कनेक्शन वाढल्याने वारंवार वीजपुरवठा खंडीत होत आहे.

सतत रात्री-अपरात्री लाईट गेल्याने पावसाळी कालावधीत लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग तसेच विद्यार्थी वर्ग व रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत उप अभियंता बेलपाडा-रेवस या कार्यालयात वारंवार तक्रार व निवेदने प्रत्यक्षात भेटी देवून देण्यात आले आहेत. मात्र काहीच प्रतिसाद न मिळाल्याने तसेच रात्र पाळीला रेवस कोळीवाड्यात विद्युत मंडळाचा एकही कर्मचारी अधिकृत नियुक्त न केल्यामुळे लाईट गेल्यानंतर तीन ते चारतास दुसऱ्या कर्मचाऱ्याची वाट पहावी लागते. त्यामुळे सदर बाब लक्षात घेवून ६०० विद्युत मिटर क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर नव्याने बसवून रेवस गावची विजेची गंभिर समस्या तातडीने सोडविण्यात यावी.

# अक्कादेवी धरण तुडूंब भरले

## पर्यटकांना आनंद लुटण्याची संधी

**। उरण । वार्ताहर ।**

विश्रांती घेतलेल्या पावसाने सुरुवात केल्याने निसर्गाच्या कुशीत डोंगरदऱ्यात असणारे अक्कादेवी धरण भरून वाहू लागले आहे. त्यामुळे पर्यटकांना सुरक्षित आनंद लुटण्याची संधी मिळणार आहे.



उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गाव अर्थात २५ सप्टेंबर १९३० रोजीचा ब्रिटिश सत्तेविरोधात झालेला स्वातंत्र्यलढा, अक्कादेवी धरणाच्या जंगल परिसरात झाला. याच ठिकाणी असणारे हे निसर्गरम्य अक्कादेवी धरण पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहे. वर्षासहलीसाठी दर रविवारी व सुट्टीच्या दिवशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करत आहेत. अक्कादेवी धरणाजवळ आदिवासी वाडी आहे. शहरी पर्यटकांना डोंगर खोऱ्यातील आदिवासींचे जीवन कसे असते, याचे यथार्थ दर्शन त्यांना येथे घडत आहे. निसर्गरम्य परिसर आणि धरणातून पडणारे पाणी याचा सुयोग्य मेळ या ठिकाणी गेल्यानंतर सहाजिकच अनुभवास येत असल्यामुळे धोकाविरहित हे धरण आहे. त्यामुळे पर्यटन वाढत असल्याने व्यावसायिक खुश आहेत.

# बैलांची चोरी करणारे गजाआड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माले या गावातील मोकळ्या माळरानावर चरण्यासाठी गेलेल्या तीन गोवंशीय बैलांची चोरी झाली होती. नेरळ पोलिसांनी याचा तपास करुन या प्रकरणी तिघांना ठाणे जिल्ह्यातून मुद्देमालासह अटक केली आहे.

पोशीर जवळील मौजे माले या गावात राहणारे गोपाळ लक्ष्मण वेहले यांच्या मालकीचे तीन बैल २६ मे २०२४ ते ८ जुन २०२४ रोजीच्या दरम्यान घराच्या पाठीमागे माळरानातील मोकळ्या जागेत चरण्यासाठी सोडले होते. अज्ञात चोरट्यांनी त्यांचे बैल चोरून नेल्याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात ८ जुन २०२८ रोजी तकार दिली होती.तीन बैलांचा शोध घेण्यासाठी नेरळ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी गुन्हयाचा तपास सहायक फौजदार श्रीरंग किसवे यांच्याकडे दिला. पोलीसांनी गुन्हा उघडकीस आणला. आरोपी साहिल नावेद शेख, वय-२० वर्षे, रा. रेतीबंदर रोड. हमालवाडी, कल्याण पश्चिम, जि. ठाणे, इम्तियाज मोहम्मद इलियास शेख, वय-३२ वर्षे, रा. जहीर मौलवी बिल्डींग, वर्तक रोड, कल्याण पश्चिम, जि. ठाणे, अकबर जाबाज शेख, वय-२८ वर्षे, रा. जहिर मौलवी चाळ, रेतीबंदर रोड, कल्याण पश्चिम, जि. ठाणे यांना १ जुलै रोजी अटक करण्यात आले. तसेच आरोपींनी गुन्हा करण्याकरीता वापरलेली एक निळसर रंगाची स्कॉर्पिओ गाडी देखील हस्तगत करण्यात आली आहे.

# म्हसळ्यातून इसम बेपत्ता

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा पोलीस स्टेशन हद्दीतील पांगळोली मोहल्यांतील अमजद मोहम्मद इसाक कौचाली वय ४२ हा मध्यमवयीन इसम मागील १० दिवसापासून बेपत्ता आसल्याची फिर्याद अमजद यांची पत्नी रुबीना वय ३७ राहाणार पांगळोली यांनी दिली आहे.

अमजद हा गुरुवार २० रोजी महाड येथे कामाला जातो असे सांगून सकाळी ६ वाजता घरांतून निघून गेला तो आद्याप आलाच नाही, आशी फिर्याद पत्नी रुबीना हिने देत परिसरांतील सर्व नातलग मित्र परिवारांजवळ शोध घेतला. अमजद हा मजबूत बांध्याचा व गोऱ्या रंगाचा आहे. घरातून जाताना काळ्या रंगाचा हाफ टी शर्ट, तशाच रंगाची फुलपँट घातली होती, तसेच डोक्यावर पांढऱ्या रंगाची मौलाना टोपी आसा पेहराव परिधान केला होता.

याबाबत काही माहिती मिळाल्यास पोलीस नाईक एम. ए .विघ्ने मोबा -९८२२४६७०२० अगर ०२१४९-२३२२४० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पोलीसांनी केले आहे.

# तळामध्ये कृषी संजीवनी पंधरवडा समारोप

**। तळा । वार्ताहर ।**

तळा पंचायत समिती येथे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात हरितक्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा करण्यात आला. तसेच तळा तालुक्यात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ वी जयंती निमित्त १७ जून ते १ जुलै २०२४ या कालावधीत कृषी संजीवनी पंधरवड्याचे आयोजन तालुका कृषी अधिकारी तळा विभागाकडून करण्यात आले होते. या मोहिमेचा समारोप कृषी दिनाचे औचित्य साधून करण्यात आला. कृषी संजीवनी पंधरवाडा मोहिमेअंतर्गत तळा तालुक्यात विविध ठिकाणी गावांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कृषि पंधरवड्यात कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात आली. कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, कृषी अधिकारी पंचायत समिती तळा सोंडकर, कृषी विस्तार अधिकारी मुंडे, मंडळ कृषी अधिकारी सारिका सावंत, आत्मा बीटीएम सचिन लोखंडे, बळीराजा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भास्कर गोळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



# वाहतूक कोंडी विरोधात मनसेचा रास्ता रोकोचा इशारा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील खोपटा कोप्रोली, गव्हान फाटा, चिर्ले आणि दिघोडे या महत्त्वाच्या रस्त्यावर रात्री अपरात्री होणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्रास सर्वसामान्य प्रवाशांना तसेच नवीम ुंबई परिसरात जाणाऱ्या रुग्णांना सहन करावा लागत आहे. वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळण्यासाठी म हाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने गुरुवार ११ जुलै २०२४ रोजी खोपटा कोप्रोली रस्त्यावर 'रास्तारोको' तसेच दिघोडे येथे शुक्रवारी १२ जुलै २०२४ रोजी रास्तारोको करण्याचा इशारा दिला आहे. उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे तसेच नवीमुंबई पोलीस आयुक्त, कस्टम विभाग यांना निवेदन देण्यात आले, अशी माहिती मनसेचे उरण तालुका अध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी दिली आहे.



उरण तालुक्याचा औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकास होत आहे. परंतु उरण पुर्व विभागातील रहिवाशांच्या रहदारीच्या खोपटा, कोप्रोली, गव्हाण फाटा, चिर्ले वेश्वी आणि दिघोडे रस्त्यावर रात्री अपरात्री बेधडकपणे अवजड वाहनांची रेलचेल सुरू असते. त्याचा त्रास हा सातत्याने सर्व सामान्य नागरिकांसह रुग्णांना, शालेय विद्यार्थी, प्रवाशांना सहन करावा लागत आहे. यार्ड गोदामात पार्किंगची व्यवस्था नसतानाही क्षमतेपेक्षा जास्त कंटेनरची हाताळणी हे व्यावसायिक करत असल्याने सदर रस्त्यावर व गोदामात बेशिस्त वाहन चालकांमुळे अपघात होण्याच्या घटनेत वाढ होत आहे. या सर्व जनतेच्या निगडीत समस्यांसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी आवाज उठवत नसल्याने, मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या मार्गदर्शना खाली गुरुवारी ११ ते १२ जुलै रोजी रास्ता रोको करण्याचा इशारा मनसेच्यावतीने मनसेचे तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी दिला आहे.

## जिंदल रुग्णालयात 'डॉक्टर्स डे' उत्साहात

**सुकेळी :** नागोठणे जवळच असलेल्या सुकेळी येथील बी.सी. जिंदल रुग्णालयात राष्ट्रीय 'डॉक्टर्स डे' अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिंदल रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांकडुन सर्व डॉक्टरांना 'डॉक्टर्स डे' च्या शुभेच्छा देत केक कापुन डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला. 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' असे मानत रुग्णांच्या सेवेत रात्रंदिवस तत्पर असलेल्या तसेच अहोरात्र रुग्णांची सेवा करुन रुग्णांना जीवनदान देणाऱ्या डॉक्टरांसाठी १ जुलै हा दिवस राष्ट्रीय 'डॉक्टर्स डे' म्हणुन साजरा करण्यात येतो.

## शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाळेचा ६३ वा वर्धापनदिन

**। कोर्लई । वार्ताहर ।**

अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिशूविहार प्राथमिक शाळेचा ६३ वा वर्धापनदिन संस्थेचे अध्यक्ष बळवंत वालेकर यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. गोपाळराव लिमये यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन सरस्वती पूजनाने कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. शिक्षण प्रसारक मंडळाची शिशूविहार शाळा क्रमांक १ जुलै १९६१ रोजी सुरू झाली. सदर शाळेचे उद्घाटन जे. एस एम कॉलेजचे तत्कालीन प्राचार्य आ. टी. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले होते.

शाळेच्या ६३ वर्षाच्या वाटचालीबाबत संस्थेचे अध्यक्ष बळवंत वालेकर, प्रमुख अतिथी ॲड. गोपाळराव लिमये, विद्यार्थिनी कुमारी सान्वी बंदरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक ॲड. प्रवीण ठाकूर, सुकुमार भगत, सुषमा सोमण, शिक्षिका सीमा तांडेल, माधुरी बोत उपस्थित होते.

निवडक

## नेत्र तपासणी शिबीर

**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम आणि रिजन ३ मधील सर्व क्लबच्यावतीने शिरढोण येथील वासुदेव बळवंत फडके हायस्कूल येथे आरोग्य आणि नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा ३१५ विद्यार्थी, पालक आणि कर्मचारी यांनी लाभ घेतला. तसेच, २२ जणांना चष्मे देण्यात आले. आरोग्य तपासणीसाठी अपोलो हॉस्पिटलची टीम तर नेत्र तपासणीसाठी लुईस कोलासो आणि निक्सन कोलासो यांनी सहकार्य केले.

## पायी वारीचे स्वागत

**पनवेल :** महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या ठिकाणाहून पंढरपूरला वाऱ्या जात आहेत, अशाच पद्धतीने मुंबईहून पंढरपूरला निघालेल्या वर्सोवातील हरी विजय वारकरी मंडळ वारीचे पनवेलयेथील टपाल नाका येथील शनी मंदिरात श्री गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष सुनील खळदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह वारी आणि वारकऱ्यांचे स्वागत केले.वारीचे हे २३ वे वर्ष असून वारीमध्ये ४० वारकऱ्यांचा समावेश होता. वर्सोवा गावातील आपले आजोबा, बाबा त्याचप्रमाणे भजनी मंडळी ही गेली अनेक वर्षे पंढरपूर वारी करत आहेत.

## वार्डनला रेनकोटची प्रतीक्षा

**पनवेल :** पावसाळ्याचा पहिला महिना संपला तरी पनवेल महापालिका क्षेत्रात काम करणाऱ्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या आणि वाहतूक नियमनासाठी नेमलेल्या सुरक्षा वार्डनला रेनकोट न मिळाल्याने भीजत किंवा हातामध्ये छत्री घेऊन कर्तव्य बजावावे लागत आहे. याबाबत अधिकाऱ्यांना विचारले असता पावसाळी रेनकोट देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असल्याचे सांगण्यात आले. पालिका प्रशासन आणि जिल्हा सूरक्षा मंडळ, महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या असमन्वयामुळे १६१ जवानांना भीजत कर्तव्य बजावावे लागत आहे.

## मोफत शिबिराचे आयोजन

**सोगाव :** जिल्हा काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष सुनिल थळे व त्यांचे सहकारी तसेच लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन गुरुवारी (दि.४) सकाळी १० ते २ वाजेपर्यंत मापगाव येथील धर्मशाळेत करण्यात आले आहे. या शिबिरात मधुमेह व मधुमेहामुळे डोळ्यांवर होणारे दुष्परिणामाबाबत जनजागृती अभियानांतर्गत समुपदेशन व मधुमेह तपासणी करण्यात येणार आहे. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नांदगावमध्ये रोपे वाटप

**मुरूड-जंजिरा :** नांदगावच्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्यावतीने स्थापना दिन तथा कृषी दिनानिमित्त नांदगाव हायस्कूलमध्ये विविध प्रकारची रोपे देऊन हा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बँकेचे व्यवस्थापक व अन्य कर्मचारी तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ए.यु.खोत, पर्यवेक्षक पि. आर. पेडणेकर, योगेश पाटील महेश वाडकर, सागर राऊत, भारत चव्हाण आदी उपस्थित होते.

# पालिकेकडून निधीचा अपहार?

## संतोष कदम यांच्याकडून हिशोबाची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरानमध्ये ब्रिटिशांनी बांधलेल्या शारलोट लेक तलावामधील गाळ पूर्वी नगरपरिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काढायचे. यानंतर मागील दहा वर्षात एकदाही गाळ काढला गेला नाही, म्हणून माथेरानमधील संतोष कदम यांनी गाळ काढण्याच्या मागणीसाठी दोन वेळा उपोषण केले आहे. तलावाच्या सुशोभीकरणासाठी केंद्र सरकारच्या अमृत-२ मधून निधी मंजूर झाला आहे. पालिकेने याकामासाठी निधी खर्च केल्याचा दावा केला असूनही या शारलोट तलावाची परिस्थिती जैसे थेच आहे. यामुळे पालिकेकडून निधीचा अपहार केल्याची चर्चा स्थानिकांमध्ये होत आहे.**

संतोष कदम यांनी मागील आठवड्यात उपोषणासाठी बसले असता त्यावेळी जीवन प्राधिकरणाकडून शारलोट तलावाच्या सुशोभीकरणासाठी २०२३ मध्ये केंद्र सरकारच्या अमृत-२ मधून ३.६६ कोटींचा निधी मंजूर झाला आहे, असे पत्र देण्यात आले होते. मात्र, त्या पत्रात तब्बल ३ कोटी रुपये दोन टप्प्यात वर्ग झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यावर उपोषणकर्ते संतोष कदम यांनी ते दोन कोटी कोणत्या कामावर खर्च केले, असा प्रश्न केला. मात्र, नगरपरिषद प्रशासनाकडून आपण लवकरच निविदा काढणार असून निवडणुकीची आचारसंहिता संपल्यावर टेंडर निघेल, असे आश्वासन दिले होते. मात्र, आता पालिका काढणारे टेंडर हे १ कोटी रूपये कामाचे आहे. त्यामुळे २ कोटींच्या निधीतून कोणती कामे झाली आहेत हे एकदा पालिकेने स्पष्ट करायला हवे, असे मत उपोषणकर्ते संतोष कदम यांनी उपस्थित केले आहे.



यावेळी एक सदस्यीय समितीचे प्रमुख जनार्दन पारटे म्हणाले की, केंद्र सरकारचे अमृत-२ मधील ३.६६ कोटी मधील २ कोटी पालिकेने खर्च केले आहेत. तर, त्या निधीतून शारलोट लेक तलावाच्या संवर्धनाची कामे करण्यासाठी जे टेंडर काढले आहे ते टेंडर कधी काढले, कोणत्या कंपनीने ठेका मिळवून काम केले आहे, अशी माहिती पालिकेने देण्याची गरज आहे. मंजूर असलेल्या निधीतून कोणती कामे केली गेली याची माहिती येथील नागरिकांना मिळायला हवी. त्यासाठी आमचा कायम पाठपुरावा राहणार असून शासनाचे २ कोटी कोणाच्याही घशात घातले जाणार नाहीत, अशी आमची ठाम भूमिका आहे. पालिकेने शारलोट लेकचे संवर्धन करताना केवळ गाळ काढण्याची कामे करू नयेत तर तलावाच्या तीन बाजूला जंगलात गाबियन वॉल बसवून जंगलाचे संवर्धन करण्याची गरज आहे. यामुळे पाण्याचा साठा देखील वाढेल आणि धरणाचे आयुष्यमान वाढण्यास मदत होणार असल्याचे जनार्दन पारटे म्हणाले आहेत.



## डॉ.अशोक जाधव पुरस्काराने सन्मानित

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोह्यातील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अशोक जाधव यांचा देशातील वैद्यकीय क्षेत्रात प्रतिष्ठित व प्रेरणादायी डॉक्टर्स म्हणून दिल्ली येथील ताज पॅलेसमध्ये 'टाइम्स नाऊ डॉक्टर डे कोन्क्लेव्ह २०२४'चा पुरस्कार केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच, डॉ. अशोक जाधव यांच्यासह देशातील एकूण २० डॉक्टरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावेळी डॉ. जाधव म्हणाले की, मला जो पुरस्कार मिळाला आहे तो संपुर्ण रोहेकरांच्या आशिर्वादाने व सहकार्यामुळे मिळाला आहे. माझ्यासाठी व माझ्या कुटुंबियासाठी हा महत्त्वाचा क्षण असल्यची प्रतिक्रिया डॉ. अशोक जाधव यांनी दिली.

# नागोठण्यात विजेचा लंपडाव

**। सुकेळी । वार्ताहर ।**

अद्याप पावसाने पाहीजे तशी सुरूवात केली नसतानासुद्धा सततच्या वारंवार होणाऱ्या वीजेच्या लंपडावामुळे नागोठणेसह वाकण, सुकेळी, बाळसई परिसरातील नागरीक हैराण झाले आहेत.जुलै महिना सुरु झाला तरी सुद्धा वातावरणात उष्णता ही वाढत असल्यामुळे पंखे, वातानुकुलीत यंत्राचा वापर वाढलेला असतांनाच वीज अनेकवेळा नसल्याने उकाड्यामुळे नागरीकांचा जीव कासावीस होत आहे. वीज कधी येणार यासंबंधीत अनेकवेळा महावितरणला फोन करुन सुद्धा महावितरणचे कर्मचारी फोन उचलत नाहीत. तर कधी फोन नॉट रिचेबल येत असल्यामुळे महावितरणच्या या गळथान कारभाराबाबत परिसरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

तसेच, वीजेचा वारंवार लंपडाव सुरू असल्यामुळे येथील अनेक व्यवहार ठप्प झाले आहेत. तर, याचा मोठा फटका हॉटेल व्यावसायिकांना बसत आहे. या प्रकारामुळे वीजेवर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण भागातील लघुउद्योजकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. दरम्यान, वेळोवेळी वीज बिले भरुन घेण्यासाठी महाविरणाकडून मोठी तत्परता दाखवली जाते. अशीच तत्परता वीज खंडीत झाल्यानंतर ती सुरळीत करण्यासाठी का दाखवली जात नाही, असा प्रश्नही उपस्थित करुन महावितरणचे अभियंता व कर्मचारी वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यास सपशेल अपयशी ठरल्याची टिकाही विभागातील नागरीकांनकडुन करण्यात येत आहे.

> **मी वाकण या ठिकाणी एक छोटासा हॉटेलचा व्यवसाय करत असुन सध्या सुरू असलेल्या वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे माझे हॉटेलमधिल अनेक वस्तुंचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे याचा मोठा फटका मला माझ्या व्यवसायामध्ये बसत आहे.**
>
> **- दिपक भगत, व्यावसायिक, वाकण**

## गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका कुणबी भवन समाज साले ग्रुपमधील इयत्ता दहावी व बारावीत ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त विद्यर्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि.१४) सकाळी ११.३० वाजता माणगावातील कुणबी भवन येथे आयोजित केला आहे. तरी ग्रुपमधील सर्व गावातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणपत्रिकेची प्रत कुणबी भवन येथे रविंद्र अर्बन ९३७३३४३४१६ यांच्याकडे जमा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



मुरूड तालुक्यातील सुरई दत्त टेकडीवरून आजूबाजूच्या बोर्ली, काजु वाडी व बार्शीव या गावांचे हिरवेगार असे नयनरम्य दृश्य. (छाया. समीर मालोदे)

# सरकारी नोकरीविषयी मार्गदर्शन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

तालुक्यातील शहाबाज पंचक्रोशीतील इयत्ता आठवीते पदवीधर विद्यार्थ्यांसाठी दि.२८ जून रोजी येथील सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालयामार्फत गणपती मंदिरात व्यवसाय व शिक्षण मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी सुहास पाटील, आल्हाद पाटील, अविनाश पाटील, यशवंत पाटील, विवेक पाटील, नितीन पाटील, मंगेश भगत, डॉ. प्रगती पाटील, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात सुहास पाटील



यांनी माझगाव डॉक लि. कंपनीतील आय.टी.आय., डिप्लोमा कोर्सेस, इतर सरकारी नोकरीच्या संधीबाबत आणि करियर विषयी विस्तृत माहिती दिली. तसेच, स्पर्धा परीक्षांकडे आजचा विद्यार्थी वळत नाही त्याकरिता पालकांबरोबर विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना पाटील यांनी तर आभार प्रदर्शन वाचनालयाचे अध्यक्ष नितीन पाटील यांनी केले.



# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**। पाली-गोमाशी । वार्ताहर ।**

आई सोमजाई माता मंडळाच्यावतीने गोमाशी गावातील दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार आणि पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दि. ३० जून रोजी शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यामध्ये वह्या, पेन, दप्तर यांचा समावेश होता. या मंडळाचा शैक्षणिक साहित्य वाटप आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यामागचा हेतू एवढाच की आपल्या गावातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा. तसेच, इतर विद्यार्थ्यांनी त्यांची प्रेरणा घेऊन आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवून आपल्या गावाचे नाव लैकिक करावे.

यावेळी सदानंद गायकवाड, मंगल जाधव, जगदीश सुतार, हरिदास गायकवाड, राजेंद्र खैरे, गजानन जंगम, वीरेंद्र जंगम, श्याम कदम, निलेश खैरे, दीपक दहीबेंकर, संदीप सुतार, राकेश मगर, अशोक गायकवाड, ओमकार जंगम, उमेश मगर, योगेश सुतार तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, महिला, नवतरुणवर्ग, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# मोठी जुई येथील पिंपळाचे झाड कोसळले

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील मोठीजुई येथील चारशेहून अधीक वर्षांपेक्षा जुने असलेल पिंपळाचे झाड कोसळल्याची घटना सोमवारी (दि.१) रात्री घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, झाडाखाली उभ्या असलेल्या काही वाहनांचे आणि दुकानांचे नुकसान झाले. तसचे, पिंपळाचे झाड पडल्याने गावातील ये-जा करणाऱ्या वाहनांची रहदारी ठप्प झाली असून मोठीजुई गावातील



बहुतेक ठिकाणी विजेचे खांब पडले असल्याने गावातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. पडलेले विजेचे खांब नव्याने त्वरित बसवून वीज पुरवठा पूर्ववत करण्याची जनतेतून मागणी होत आहे. तसेच, ज्या नागरिकांचे या घटनेमुळे आर्थिक नुकसान झाले आहे त्या नागरिकांना भरपाई मिळावी, अशी मागणी जनतेतून केली जात आहे.

## रविंद्र म्हात्रे सेवानिवृत्त

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील कोप्रोली गावचे रहिवासी रवींद्र मधुसूदन म्हात्रे हे ग्रामविकास अधिकारी म्हणून ३४ वर्षाच्या शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवानिवृत्ती सोहळा रविवार दि. ३० जून कोप्रोली येथे माजी आ. मनोहर भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी महेंद्र ठाकूर, विश्वास म्हात्रे, कमलाकर पाटील, चंद्रशेखर ठाकूर, निर्भय म्हात्रे व म्हात्रे कुटुंबीय व कार्यकर्ते उपस्थित होते.



# मित्र संस्थेचा मदतीचा हात

**। तळा । वृत्तसंस्था ।**

कृषी दिनाचे औचित्य साधुन श्री रविप्रभा मित्र संस्था व रिलेशन रिअलटेक प्रा.लि.कं. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तळा आणि म्हसळा तालुक्यात शालेय विद्यार्थ्यांना व अंगणवाडीतील चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य व वृक्ष वाटप करण्यात आले. यामध्ये तळा तालुक्यातील वाशी हवेली, मजगाव ताम्हाणे तसेच म्हसळा तालुक्यातील कांदळवाडा निगडी, खारगाव (बु.) या राजिप शाळांचा व अंगणवाडींचा समावेश होता.

यावेळी सुरेखा तांबट, म्हसळा गट विकास अधिकारी एम. के. जाधव, राजेंद्र ढंगारे, रविंद्र लाड, दिपक ठाकुर, मदन वाजे, गणेश वाजे, जगन्नाथ तांडेल, पांडुरंग बने, पांडुरंग सुतार, अजय म ोहिते, मिलिंद मोरे, जाधव सर, अनंत नाक्ती, हेमंत नाक्ती, नरेश विचारे, संतोष उध्दरकर, सुशांत लाड, समीर लांजेकर, किशोर गुलगुले, शांताराम निंबरे, शंकर कासार, सुजित काते, अमन भाई आदि उपस्थित होते.

# नांदगाव रस्त्यावर झाड कोसळले

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यात दमदार पडलेल्या पावसामुळे अलिबाग-मुरुड रस्त्यावर सर्वे खिंडीत व नांदगाव वाघोबा मंदिर रस्त्यावर झाड पडल्याने काही वेळ वाहतूकीवर परिणाम झाला होता. मात्र, सुदैवाने जीवित व वित्त हानी झालेली नाही. तालुक्यातील या रस्त्यावर सर्वे खिंड येथे रात्रीच्या वेळेस सागाचे तर पहाटेच्या वेळेस वाघोबा मंदिर रस्त्यावर वडाचे झाड पडल्याचे वृत्त



समजताच संबंधित अधिकाऱ्यांनी स्थानिकांच्या मदतीने हे झाडे तोडून रस्त्याच्या बाजुला करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग
- Require Fresher/Experienced Civli engineers for Alibaug Project. Email CV to projects@parthinfraalibaug.com 9922768626 https://parthinfraalibaug.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## मीटरनुसार भाडे आकारण्याची मागणी

# रिक्षा चालकांकडून ग्राहकांची लुट

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पेण शहरामध्ये काही रिक्षा चालकांची सुरू असलेल्या मनमानीमुळे येथील ग्राहक आवाज उठवू लागले आहेत. यावेळी पेण येथील ज्येष्ठ नागरिकांनी पेण तालुका पत्रकार संघटनेकडे लेखी तक्रार दिली असून त्यामध्ये काही रिक्षा चालक कसे उध्दट वागतात व जास्तीचे पैसे घेतात या विषयी भाष्य केले असून या विषयावर प्रसार माध्यमांनी गांभीर्याने लक्ष घालावे, अशी विनंती केली आहे.**

पेण शहरामध्ये पेण एसटी स्टॅन्ड, कोतवाल नाका, पोलीस स्टेशन, कोळीवाडा नाका, चावडी नाका, प्रेम नगर, रामवाडी या ठीकाणी रिक्षा थांबा आहेत, परंतु हे सर्व थांबे कायदेशीर नाहीत. तसेच, पेण एसटी डेपो-रामवाडी ४० ते ५० रू., रामवाडी-पेण एसटी डेपो ५० रू. पुन्हा पेण एसटी डेपो-प्रायव्हेट हायस्कूल ३० रू., पेण एसटी डेपो-कारमेल हायस्कूल ५० रू., पेण एसटी डेपो-गुरूकुल ३० रू., पेण एसटी डेपो-रेल्वे स्टेशन ३० रू. असे भाडे असून काही रिक्षा चालक जास्तीचे भाडे आकारून ग्राहकांची




लुट करत आहेत.

या विषयी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातून माहिती घेतल्यानंतर असे लक्षात आले की, कमीत कमी २३ रूपये एवढे भाडे पेण शहरात आकारायचे आहेत. त्याच्या पुढे १० मिटर मागे २ रूपयांची वाढ करायची आहे. तसेच, रात्री १२ ते सकाळी ५ पर्यंत होणाऱ्या भाड्यामध्ये २५ टक्के वाढ करायची असते. परंतु, रिक्षा चालक आपल्या मर्जीप्रमाणे भाडे आकारत असून ग्राहकांची लुट करत आहेत. त्यामुळे पेणमध्ये मिटर प्रमाणे भाडे आकारावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

> **पेण शहरामध्ये मिटर प्रमाणे भाडे आकारावे म्हणून आम्ही केव्हाच सुचना दिल्या आहेत आणि त्यानुसार रिक्षा चालकांनी भाडे घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. असे भाडे रिक्षा चालक आकारत नसतील तर ग्राहकांनी आमच्याकडे तक्रार करावी. आम्ही त्या रिक्षा चालकांवर कायदेशीर कारवाई करू.**
>
> **- महेश देवकाते, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी**

# डॉ. सुनील पाटील यांचा 'आरोग्यम् धनसंपदा' पुरस्काराने सन्मान

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यातील प्रतिथयश डॉक्टर व येथील मायालक्ष्मी नर्सिंग होमचे संचालक डॉक्टर सुनील पाटील यांना नुकतेच आरोग्यम् धनसंपदा या पुरस्काराने गौरवण्यात आले. देशभर नुकत्याच साजरा करण्यात आलेल्या राष्ट्रीय डॉक्टर्स डे




निमित्ताने नवी मुंबई येथील 'इन मेजर सिटीज' या संस्थेद्वारा आयोजित करण्यात आलेल्या 'आरोग्यम् धनसंपदा २०२४' या पुरस्काराने रायगड व नवी मुंबई मधील ३९ व्यावसायिक डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये नागोठणे येथील डॉक्टर सुनील पाटील यांचाही आरोग्य क्षेत्रातील त्यांच्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल यथोचित सन्मान करण्यात आला. डॉक्टर सुनील पाटील यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल नागोठणे शहर, ग्रामीण विभाग तसेच रोहा तालुक्यातील सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

---

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM RAIGAD - ALIBAG COLLECTOR OFFICE BUILDING, SECOND FLOOR, NEAR HIRAKOT TALAV TAL. ALIBAG, DIST. RAIGAD-402201**
Website - www.confonet.nic.in
Under the Consumer Protection Act, 2019
Consumer Case No. 21/104

Ganpat Gajanan Gondhali .....Petitioner/Complainant/Appellant
Versus
Toyoto Aparna Moters Pvt. Ltd ...... Opposite Party/ Respondent(s)
To
Opposite Party / Respondent Name:
3 . Dnyaneshwar Warade
Flat No B-27, opp. Teliphone Exchange, Main Road Wagale, Estate Thane
जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जा. नो./२०२४/६०७
दिनांकः - ०१/०७/२०२४

## जाहीर प्रकटन

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्याखाली तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत/पत्ता बदलला/मिळून येत नाही. म्हणून या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दिनांक ३१ Jul २०२४ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल यांची दाखल घ्यावी.

मे. अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार.
ठिकाण:- अलिबाग-रायगड
दिनांक :-
सही/-
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक हेमंत माधव ठाकूर वै ४ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| १० | ७१ | ५.४६.२७ | ५५.०० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/०७/२०२४
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

---

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. जैद इक्बाल गोंडेकर, २) कु. हुमेरा इक्बाल गोंडेकर व ३) सौ. सना अबरार राखे यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने / व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड. | ३६४ | ०-६४-३० | ०.९४ |

अलिबाग,
दिनांक : ०३/०७/२०२४.
**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन -२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१.

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मांडला, ता. मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या बिद्यमान मालक उमेश वसंत गावडे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मांडला ता. मुरूड, | ९ | जिरायत ०-६०-७० पो.ख. ०-०८-६० एकुण ०-६९-३० | १७.१९ |

वर वर्णन जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू बर्णन केलली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. बा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०२/०७/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२
**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. बरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

---

अर्जदार तर्फे ॲड. आर. बी. कोसमकर

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**
**जि. रायगड.**
दिवाणी चौकशी अर्ज नं. ४१/२०२४

१) श्रीमती धनश्री विहंग अभ्यंकर
वय ४२ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा. बी २-३०३, सृष्टी रेसीडेन्स्य,
न्यु कल्याण रस्ता, आर के टॉवर मागे,
कांचेंगओण डोंबिवली (पूर्व) कल्याण, ठाणे
२) श्री. ऋषिकेश रणजीत करंदीकर — अर्जदार
वय ३९ वर्षे, धंदा-व्यवसाय
३) श्री. रणजीत लक्ष्मण करंदीकर
वय ७४ वर्षे, धंदा-निवृत्त
दोघेही रा. १६ प्रांजली बिल्डिंग, गोशाळा रोड,
मुलूंड (पश्चिम), मुंबई ४०००८०
मो. ७७७५९७७१११

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी या जाहिर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की,
१) अर्जदार क्र. १ व २ यांची आई व अर्जदार क्र. ३ यांची पत्नी कै. चंदप्रभा रणजीत करंदीकर हिचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.
२) अर्जदार क्र. १ व २ यांची आई व अर्जदार क्र. ३ यांची पत्नी कै. चंद्रप्रभा रणजीत करंदीकर हिची खालील नमुद खालील नमूद केलेली मिळकत आहे. मौजे अलिबाग, सिटी सर्व्हे नं. ७५३ ओ व ७५३ क या मिळकतीवर असलेली रुद्राक्ष को. ऑप. हौ. सोसायटी, अलिबाग मधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका क्र. १, क्षेत्र ३६ चौ. मी. कार्पेट असून त्याचा अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र. १५८४, नवीन मालमत्ता क्र. Z1BHA001904 असा आहे.

अशाप्रकारे वर नमुद केलेली मिळकत आहे.

सदर वर नमुद केलेली मिळकत अर्जदार यांना मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वरील सर्व वर नमुद केलेल्या मिळकतींचे कायदेशीर वारस म्हणून वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मयत चंद्रप्रभा रणजीत करंदीकर हिच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या वारस हक्काबद्दल कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या अर्जाची पुढील दि.२९/०७/२०२४ रोजी स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात हजर राहून नोंदवावी. अशी कोणतीही हरकत आली नाही तर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक ०२ माहे ०७ सन २०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,कनिष्ठ स्तर,**
**अलिबाग-रायगड**

**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चिंचघर, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी असणारे विद्यमान मालक श्री. विनित अनिल गावंड यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-१३-०० ( हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे त्यांचेकडून कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| चिंचघर | २३ | ००-१३-०० | ०.६४ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे ७/१२ सदरी भोगवटादार व मालक म्हणून असणारे विद्यमान मालक श्री. विनित अनिल गावंड यांचे मालकीचे व हिश्शाचे असे ००-१३-०० (हे.आर.चौ.मी) एवढे क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पेण
दि.०२/०७/२०२४
**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा.मु.दुरशेत, पो. बळवळी ता. पेण, जि. रायगड
मो.क्र.७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक वसंत प्रभाकर बल्लाळ यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रा (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ५१ | ११ | ०-१९-०० | ०-२० |
| ५१ | १२ | ०-११-०० | ०-१६ |
| ५३ | २/ब | ०-१६-४० | ०-६६ |
| ५३ | ८ | ०-२९-६० | १-३१ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपटटा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/०७/२०२४
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

---

## नोटीस

दिनांक : ०३/०७/२०२४

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे भोईघर, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत ही आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १. निरा बाळाराम मांजरेकर, २. मच्छिंद्रा चांगु मोरे, ३. रेश्मा रामचंद्र गावणकर, ४. मोनिका दिपक भेकरे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीसस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्बंध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कया कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे भोईघर, ता. मुरुड, रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भोईघर ता. मुरुड | २७३ | क्षेत्र ०-६८-०० पो.ख. ०-०५-३० एकूण क्षेत्र ०-७३-३० | ९.६९ |

वर नमुद मिळकतीपैकी क्षेत्र ०-३२-०० हे.आर., पो.ख. ०-०५-३० हे.आर., एकूण क्षेत्र ०-३७-३० हे. आर., आकार ४.५५ रु.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२२-०० हे. आर. ही मिळकत.

दिनांक :- ०३/०७/२०२४
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अर्पाटमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## नोटीस

दिनांक ०३/०७/२०२४

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे, वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत ही आमचे अशिल यांनी विद्यमान मालक विनायक हरिश्चंद्र घरत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे ता. अलिबाग | ३६५ | क्षेत्र ०-१४-१० पो.ख. ०-०१-०० **एकूण क्षेत्र ०-१५-१०** | १.१९ |

दिनांक :- ०३/०७/२०२४
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता फ्लॅट नं. १०३. पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अर्पाटमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. अब्दुल्लाह अब्दुल हक खान यांनी खालील वर्णन केलेली मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी त्या मिळकतीचे मालक श्री. ज्ञानेश्वर शांताराम शेकटे यांचे हिश्याचे अविभक्त क्षेत्र त्यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णनः**
**मौजे. बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ३१ | ४ | ०-१८-२० पो.ख. ०-००-८० एकूण ०-१९-०० पैकी, त्यांचे मालकीचे अविभक्त क्षेत्र १६२८.५७ चौ.मी | १ | ३७ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०७/२०२४
पत्ताः १०१,१०२,१०३, बुरहान प्लाझा,
दिलकप कॉलेज रोड, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०१०१
मो ९०११५५५८०१
सही/-
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) जितमन्यु समरजितसिंग सीरोही २) दिपीका समरजितसिंग सीरोही यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५१ | १/ब/१ | ०-३२-०० | ०-३० |
| ५१ | ४ | ०-१३-६० | ०-०६ |
| ५२ | ३ | ०-३०-५० | २-९४ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/०७/२०२४
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

अर्जदाराचे वकील श्री. विकास हरिश्चंद्र पाटील

## जाहिर नोटीस

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर जिल्हा रायगड यांचे न्यायालयात.**
दिवाणी चौकशी अर्ज क्र. : ८७/२०२४.
(प्रोबेट मिळणेकरीता)
नेमलेली पुढील तारीख ०८-०८-२०२४

श्री. शैलेश श्रीकिशन धराधर,
वय ६० वर्षे, धंदा- नोकरी, ... अर्जदार.
राहणार- मु.पो. वरसोली,
तालुका- अलिबाग, जि. रायगड.

विरूध्द

(१) सौ. शुभांगी शैलेश धराधर,
वय ५५ वर्षे, धंदा- गृहिणी,
(२) सिध्दार्थ शैलेश धराधर,
वय ३३ वर्षे, धंदा- नोकरी,
(३) रिध्दीश शैलेश धराधर,
वय २७ वर्षे, धंदा- नोकरी,
क्र. १ ते ३ रा. ब्लॉक नं. २,
डिजय स्मृती, पहिला मजला,
अशोक नगर, ठाकूर हाऊस समोर,
कांदिवली (पुर्व) मुंबई ४००१०१.
(४) अक्षय संतोष धुरंधर, .. सामनेवाले.
वय २७ वर्षे, धंदा- नोकरी,
(५) हर्ष संतोष धुरंधर,
वय २३ वर्षे, धंदा- शिक्षण,
क्र.४ व ५ रा.-अ-४/८, सीमंधर पार्क)
जनता नगर कास रोड, घटलोडीया
अहमदाबाद, ३८००६१
(६) अभिजीत विनय रणजित,
वय ३७ वर्षे, धंदा- नोकरी,
राहणार- पी.पी.डी. भुवन नं.५,
विर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई-१६.

या जाहिर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की,

अर्जदार याची काकी श्रीमती सरिता नाथकुमार धराधर हिने तिच्या हयातीमध्ये दिनांक ०७ जुलै २०१० रोजी तिच्या मिळकतीबाबत तिच्या मर्जीने मृत्यूपत्र केले असून त्या मृत्युपत्रामध्ये अर्जदार याची नेमणूक व्यवस्थापक म्हणून केली आहे. त्यामुळे अर्जदार प्रस्तुतचा अर्ज मृत्यूपत्राचा प्रोबेट दाखला मिळण्याकरीता मा. न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज दाखल केला आहे.

सरिता नाथकुमार धराधर हिचे दिनांक २६-०५-२०१४ रोजी मुंबई येथे निधन झाले असून बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मृत्यू प्रमाणपत्र दिले आहे.

कै. सरिता नाथकुमार धराधर यांनी मृत्यूपत्रान्वये त्यांच्या स्थावर व जंगम मिळकती मृत्यूपत्रातील लाभार्थी यांना दिलेल्या आहेत.

अर्जदार यांच्या अर्जास वा कै. सरिता नाथकुमार धराधर यांच्या दिनांक ०७-०७-२०१० रोजीच्या मृत्युपत्रास कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या पुढील नेमलेल्या तारखेस स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वा वकील यांचेमार्फत सकाळी ११-०० वाजता मा. न्यायालयात हजर राहून लेखी स्वरूपात आवश्यक त्या कागदपत्रांसह नोंदवावी.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, नेमलेल्या तारखेस हरकत घेतली नाही तर हे मा. न्यायालय अर्जदार यांचे हक्कांबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व अर्जदार पात्र ठरल्यास अर्जदार यांना प्रोबेट दाखला मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक ०१ माहे ०७ सन २०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अलिबाग**

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अलिबाग**

---

**ग्रुप ग्रामपंचायत देगाव ता. माणगाव, जि रायगड**
**निविदा सूचना**
(ग्रा.प. नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.०२/०७/२०२४)

ग्रुप ग्रामपंचायत देगाव खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे..

| अ. क्र | कामाचे नाव / वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा अंतिम तारीख | निविदा सादर करणेचा वेळ | निविदा सादर करणेचा ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रा.जि.प.प्राथमिक शाळा दुरुस्ती करणे, | ३०००००/- | ३ महिने | ०९/०७/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय | ३०००/- | २००/- |
| २ | निळगुण आ.वाडी येथे साकव बांधणे. | ३०००००/- | ३ महिने | ०९/०७/२०२४ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय | ३०००/- | २००/- |
| ३ | पाणी शुद्धीकरण साहित्य खरेदी करणे | ६००००/- | ३ महिने | ०९/०७/२०२४ | स.१०.०० वापर्यंत | ग्रा.पं.कार्यालय | ६००/- | २००/- |

अटी व शर्ती
१ प्राप्त निविदा दि. ०९/०७/२०२४ रोजी स. ठिक १०.०० वाजता ग्रा.प. देगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत देगाव ता माणगांव, जि. रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देगाव ता माणगांव, जि. रायगड**

---

## ग्रुप ग्रामपंचायत कुंभे

**ता. माणगाव, जि. रायगड निविदा सूचना**

कुंभे ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत इच्छुक ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाज पत्रिकिय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कामतवाडी तलावातील गाळ काढणे व सवरक्षण जाळी बसवणे | १५ वित्त आयोग व ग्रामनिधी | १८९९१० | ३ महिने | ९/७/२०२४ | कार्यालीन वेळेत | ग्रां प कार्यालय कुंभे |
| २ | स्मशान भूमी शेड बांधणे | ग्रामनिधी | ७५००० | ३ महिने | ९/७/२०२४ | कार्यालीन वेळेत | ग्रां प कार्यालय कुंभे |
| ३ | मागासवर्गीय रस्ता मुळगाव केलगन | ग्रामनिधी | ८०००० | ३ महिने | ९/७/२०२४ | कार्यालीन वेळेत | ग्रां प कार्यालय कुंभे |

**अटी व शर्ती**
१ १ टक्क इसारा रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेचा कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी भरावी लागेल व उर्वरित कपात रक्कम देयकातून अदा केली जाईल.
२ कोरे निविदा फॉर्म रक्कम रुपये १००% इतकी रहील
३ कामाचे अंदाज पत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास शुल्क भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४ प्राप्त निविदा माहे दि. १०/०७/२०२४ मासिक सभेत ग्रामपंचायत कार्यालय कुंभे येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांचा हस्ते उघडण्यात येईल
५ निविदा भरणाऱ्या ठेकेदारांचे रजिस्ट्रेशन केलेले दाखले हे सत्य प्रत केलेले असावेत व चालू आर्थिक वर्षात केलेल्या कामाचा समक्ष प्रधीकारायचा दाखला असावा व ठेकेदार हा नोंदणीकृत (GST धारक) असावा.
६ कोणतीही एक किंवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारायचा सरपंच कुंभे यांनी राखून ठेवला आहे
७ प्रत्येक देकाक्डून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील सबंधित खात्याचे मा. अभियंता सो ग्रामपंचायतीचे पदाधिकारी/ सदस्य यांचा मार्गदर्शन व देखरेखी खाली सदर काम करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्यांची स्थिती थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.
८ काम अंतिमरित्या पूर्ण झाले नंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९ प्राप्त निधीनुसार PFMS प्रणाली द्वारे कामाचे देयक अदा केले जाईल.

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कुंभे**

**सरपंच**
**ग्रामपंचायत कुंभे**

निवडक

## सिंगापूरने बोली जिंकली

**सिंगापूर :** वर्ल्ड चॅम्पियनशिप सामन्याचे आयोजन करणार आहे. हा सामना भारताचा ग्रँडमास्टर डी गुकेश आणि विश्वविजेता चीनचा डिंग लिरेन यांच्यात २० नोव्हेंबर आणि १५ डिसेंबर रोजी होणार आहे. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने सोमवारी सिंगापूरच्या यजमानपदाची घोषणा केली. यापूर्वी सिंगापूरने या सामन्याचे आयोजन करण्यासाठी २०.८६ कोटी रुपयांचा लिलाव जिंकला होता. वर्ल्ड चॅम्पियनशिप मॅच आयोजित करण्यासाठी ३ अर्ज प्राप्त झाले होते.

## नाओमीची विजयी सुरुवात

**नवी दिल्ली :** सोमवारपासून विम्बल्डनच्या पहिल्या फेरीला सुरुवात झाली. जपानची स्टार टेनिसपटू नाओमी ओसाकाने विजयाने सुरुवात केली. तीन वर्षांनंतर या ग्रँडस्लॅममध्ये खेळण्यासाठी आलेल्या ओसाकाने पहिल्या फेरीच्या सामन्यात फ्रान्सच्या डाबने पेरीचा तीन सेटमध्ये ६-१, १-६, ६-४ असा पराभव केला. दोन वेळची ग्रँडस्लॅम चॅम्पियन ओसाकाने सामना एक तास ३२ मिनिटात जिंकला. २०१८ नंतरचा विम्बल्डनमधील हा तिचा पहिला विजय आहे.

## बजरंग पुनिया संतापला

**नवी दिल्ली :** नॅशनल अँटी डोपिंग एजन्सीने नुकतेच कुस्तीपटू बजरंग पुनियाला दुसऱ्यांदा निलंबित केले होते. एजन्सीने बजरंग पुनियावर राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. वास्तविक, मार्चमध्ये सोनीपत येथे झालेल्या राष्ट्रीय चाचणीदरम्यान बजरंग पुनियाने डोप चाचणीसाठी त्याचे सँपल दिले नव्हते. नोटिशीला उत्तर देण्यासाठी बजरंग पुनिया यांच्याकडे ११ जुलैपर्यंत वेळ आहे.

## पेनल्टी हुकली, रोनाल्डो रडला

**जर्मनी :** येथे सुरू असलेल्या युरो कप २०२४ च्या राऊंड ऑफ १६ मध्ये ख्रिस्तियानो रोनाल्डोला पेनल्टीवर गोल करण्यात अपयश आले. स्लोवेनिया विरूद्धच्या सामन्यात रोनाल्डोला पेनल्टीवर गोल करता आली नाही. त्याला मैदानातच रडू कोसळले. रोनाल्डो पाठोपाठ त्यांची आई स्टँडमध्ये रडू लागली. त्याने पेनल्टीवर गोल केला असता तर पोर्तुगालला साम न्यात आघाडी मिळाली असती. सामना पेनल्टी शूटआऊटवर गेला नसता.

## इंग्लंड संघाची उसळी

कलोन : युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या बाद फेरीत (राऊंड ऑफ १६) गतउपविजेत्या इंग्लंडने जबरदस्त उसळी घेताना स्लोव्हाकियाविरुद्ध पराभवाच्या खाईतून अतिरिक्त वेळेत २-१ फरकाने विजयाला गवसणी घातली, तर एका गोलच्या पिछाडीवरून तीन वेळच्या माजी विजेत्या स्पेनने झुंजार जॉर्जियावर ४-१ अशी मात करून उपांत्यपूर्व फेरीतील जागा पक्की केली. गेल्झनकिर्शन येथे स्लोव्हाकियाचा संघ कमनशिबी ठरला.

### झिम्बाब्वेविरूद्धच्या टी-२० मालिकेसाठी

# ३ नवे खेळाडू संघात दाखल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**टी-२० वर्ल्डकपनंतर लगेचच होणाऱ्या झिम्बाब्वेविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय टी-२० मालिकेसाठी बीसीसीआयकडून संघात बदल करण्यात आले आहेत. झिम्बाब्वे मालिकेसाठी भारताने वर्ल्डकप सुरू असतानाच संघ जाहीर केला होता. पण आता या संघात साई सुदर्शन, जितेश शर्मा आणि हर्षित राणा या तीन खेळाडूंना संधी देण्यात आली आहे.**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा आधीच करण्यात आली होती. कर्णधारपद शुबमन गिलकडे देण्यात आले होते. दरम्यान, या मालिकेसाठी टी-२० विश्वचषकातील संघामधील एकूण ५ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. पण भारतीय संघ अजूनही बार्बाडोसमध्येच अडकला असल्याने भारतात परतलेला नाही. त्यामुळे संघात अचानक बदल करणे भाग पडले आहे. पहिल्या दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी साई सुदर्शन, जितेश शर्मा आणि हर्षित राणा यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. संजू सॅमसन, शिवम दुबे यशस्वी जैस्वाल यांची जागा घेतील. हे तीन खेळाडू प्रथम संपूर्ण संघासह भारतात येतील आणि त्यानंतर मालिका खेळण्यासाठी हरारेला रवाना होतील. झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या आणि दुसऱ्या टी-२० सामन्यांसाठी भारतीय संघः शुबमन गिल (कर्णधार), ऋतुराज गायकवाड, अभिषेक शर्मा, रिंकू सिंग, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रियान पराग, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, आवेश खान, खलील अहमद, मुकेश कुमार, तुषार देशपांडे, साई सुदर्शन, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), हर्षित राणा यांचा समावेश आहे.



## अल्कराझची विजयी सलामी

**लंडन :** गतविजेत्या कार्लोस अल्कराझने प्रतिष्ठेच्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेतील आपल्या मोहिमेस सोमवारी यशस्वी सुरुवात केली. पहिल्या फेरीच्या लढतीत अल्कराझने पात्रता फेरीतून आलेल्या मार्क लजालचा ७-६ (७-३), ७-५, ६-२ असा पराभव केला.

जागतिक क्रमवारीत २६९ व्या स्थानावर असलेल्या लाजलच्या प्रतिकारामुळे अल्कराझही चकित झाला होता. महिला एकेरीत नवव्या मानांकित मारिया सक्कारीने विजयी सुरुवात करताना मॅकॅर्टनी केसलरला ६-३, ६-१ असे सहज पराभूत केले. फ्रेंच खुल्या स्पर्धेची उपविजेती जॅस्मिन पाओलिनीने चौथ्याप्रयत्नातविम्बल्डनचीपहिली फेरी पार केली. तिने सारा सोरिबेस टोर्मोचाचा ७-५, ६-३ असा पराभव केला. पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत डॅनिल मेदवेदेवने ॲलेक्झांडर कोवासेविचचा, कॅस्पर रूडने ॲलेक्स बोल्टचा पराभव केला.

## झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेसाठी टीम इंडिया रवाना

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

झिम्बाब्वेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी टीम इंडिया मंगळवारी सकाळी मुंबईला रवाना झाली. झिम्बाब्वे दौऱ्यावर भारताला पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. या मालिकेतील पहिला सामना हरारे येथे ६ जुलै रोजी होणार आहे. बीसीसीआयने टी-२० विश्वचषकादरम्यान झिम्बाब्वे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली होती. शुभमन गिलला संघाचा कर्णधार करण्यात आला. टी-२० विश्वचषक खेळण्यासाठी गेलेल्या संघातील काही खेळाडूंचाही या संघात समावेश आहे.



मात्र, वादळामुळे तो सध्या बार्बाडोसमध्ये अडकून पडला आहे. पण बाकीचे खेळाडू भारतातच होते. तो मुख्य प्रशिक्षक व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्यासोबत (फक्त या दौऱ्यासाठी) झिम्बाब्वेला रवाना झाले. बीसीसीआयने आपल्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवर संघाच्या प्रस्थानाचे काही फोटोही शेअर केले आहेत. बार्बाडोसमध्ये अडकलेल्या खेळाडूंमध्ये यशस्वी जैस्वाल, रिंकू सिंग, खलील अहमद आणि संजू सॅमसन यांचा समावेश आहे. या खेळाडूंना झिम्बाब्वेला कधी आणि कसे पाठवले जाईल याबाबत बीसीसीआयने कोणतेही विधान जारी केलेले नाही. या संघाला आतापर्यंत भारताविरुद्धची मालिका जिंकता आलेली नाही

## ... आणि तस्किन अहमदला झोप लागली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

टी-२० विश्वचषक २०२४ ही स्पर्धा अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये पार पडली. भारतीय संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून विजेतेपद पटकावले. दरम्यान, आता एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. खरं तर, भारत आणि बांगलादेश यांच्यात झालेल्या सुपर-८ सामन्यात बांगलादेशच्या एका अनुभवी खेळाडूला झोप लागली होती. त्यामुळे त्याची बस चुकली होती. यासाठी संघ व्यवस्थापनाने या खेळाडूला शिक्षाही केली. त्यानंतर आता हा खेळाडू आपल्या सहकाऱ्यांची माफी मागत आहे.

भारताविरुद्धच्या सामन्यापूर्वी उशिरापर्यंत झोपलेला खेळाडू म्हणजे बांगलादेशचा स्टार गोलंदाज तस्किन अहमद होय. तो बांगलादेशच्या टी-२० संघाचा उपकर्णधारही आहे. तस्किन अहमदने २०२४ च्या टी-२० विश्वचषकातीव ७ सामन्यात एकूण ८ विकेट्स घेतल्या. तस्किन अहमदनेग्रुपस्टेजमध्येश्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या होत्या. या चमकदार कामगिरीने सुपर-८ मधील त्याची दावेदारी चांगलीच भक्कम झाली होती.




जेव्हा बांगलादेश संघ सुपर-८ मध्ये भारताचा सामना करत होता, तेव्हा नाणेफेकीनंतर बांगलादेशच्या कर्णधाराने प्लेइंग इलेव्हन जाहीर केली, तेव्हा संघात एक बदल करण्यात आला होता. ज्यामध्ये संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज तस्किन अहमदच्या जागी जॅकर अलीचा समावेश करण्यात आला होता. या बदलामुळे बांगलादेश क्रिकेट संघाचे चाहते आश्चर्यचकित झाले होते. कारण तस्किन अहमद चांगल्या फॉर्ममध्ये होता. भारताविरुद्ध तो चांगला खेळू शकला असता. अचंबित झालेल्या चाहत्यांना त्यावेळी काहीच समजले नाही. पण आता तस्किन अहमदला संघात स्थान का मिळाले नव्हते, याबद्दल आता खुलासा झाला आहे. बांगलादेश आणि भारत यांच्यात २२ जून रोजी सामना झाला होता. हा सुपर-८ चा सामना बांगलादेशसाठी खूप महत्त्वाचा होता. या सामन्यात सहभागी होण्यासाठी बांगलादेशचा संघ सकाळीच स्टेडियमकडे रवाना झाला. संघाचे सर्व खेळाडू आणि सहाय्यक कर्मचारी बसमध्ये येऊन बसले होते. दरम्यान, वेगवान गोलंदाज तस्किन अहमदची सर्व संघ वाट पाहत होता. त्यावेळी तस्किन अहमद कोणाचाही फोन उचलत नव्हता. बांगलादेशचे प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघा संघासह स्टेडियमकडे रवाना झाले. तस्किन अहमदला प्लेइंग लेव्हनमध्ये स्थान देण्यात आले नसल्याचे प्रमुख कारण आता उघड झाले आहे.

## भगवत गीतेतील श्लोक शोएबने केला व्हायरल...डिलीट

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब अख्तर याने भगवद्गीतेचा एक श्लोक भगवान श्रीकृष्णांच्या फोटोसह त्याच्या सोशल मीडियावर पोस्ट केला होता. शोएब अख्तर याच्या या पोस्टची जगभरात चर्चा सुरु झाली आहे. ही पोस्ट वेगाने व्हायरल झाली आहे. त्याच्यावर अनेक प्रकारच्या कॉमेंट येत आहेत. त्यानंतर त्याने ती पोस्ट डिलीट केली आहे.

भगवद्गीता हिंदूंसाठी पवित्र आणि महान ग्रंथ आहे. भगवद्गीतेमधील तत्वज्ञान संपूर्ण जगाने मान्य केले आहे. त्यामुळे जगातील जवळपास सर्वच भाषांमध्ये भगवद्गीता ग्रंथ आला आहे. भगवान श्रीकृष्ण यांनी त्यांचा प्रिय शिष्य अर्जुन याला दिलेले ज्ञान महर्षी व्यास यांनी सर्वांसाठी भगवद्गीतेच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले आहे. हजारो वर्षानंतर भगवद्गीतेचे महत्व अबाधित आहे.




### काय लिहिले शोएबने पोस्टमध्ये

**शोएब अख्तर यांने भगवद्गीतेवरील एक श्लोक लिहिला आहे. सोबत भगवान कृष्णाचा फोटो पोस्ट करत अख्तरने लिहिले की, ''अनियंत्रित मनापेक्षा मोठा शत्रू नाही.'' मात्र, शोएब याने नंतर ही पोस्ट काढून टाकली. मात्र तोपर्यंत ती व्हायरल झाली होती. आता अनेक जण ही पोस्ट स्क्रीन शॉटसह सोशल मिडीयावर व्हायरल करत आहेत.**

### पोस्ट का डिलीट केली?


**शोएब अख्तर याने भगवद्गीतेचा श्लोक पोस्ट केल्याने अनेकांना खूप आश्चर्य वाटत आहे. कारण अध्यात्मिक पोस्ट शोएब अख्तर याने कधी टाकली नाही. यापूर्वीही त्याने अधूनमधून अशा पोस्ट केल्या आहेत. परंतु आता त्याच्या या पोस्टमागचा हेतू काय होता हे स्पष्ट झाले नाही. तसेच अख्तरने ही पोस्ट नंतर त्याच्या इन्स्टाग्रामवरुन काढून का टाकली? यावर आता चांगलीच चर्चा सुरु झाली आहे.**

### शोएबने यापूर्वी टीम इंडियाचे केले अभिनंदन

**साहजिकच शोएब अख्तर याच्या या पोस्टवर पाकिस्तानकडून तिखट प्रतिक्रिया येत आहेत. त्यामुळे त्याने ही पोस्ट काढली असणार, अशी चर्चा सुरु आहे. यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाने टी विश्वविजेतेपद पटकवल्यानंतर ४८ वर्षीय शोएब अख्तरने त्यांचे अभिनंदन केले होते. त्यावेळी अख्तरने लिहिले होते की, 'रोहित शर्मा याने करुन दाखवले, भारतीय संघ या विजयाचा दावेदार होता.'**

## बॅडमिंटन खेळताना आयुष्याचा श्वास थांबला

**चीन :** एका १७ वर्षाच्या चिनी खेळाडूचा बॅडमिंटनच्या कोर्टवरच मृत्यू झाला. या खेळाडूच्या मृत्यूने बॅडमिंटन विश्वावर शोककळा पसरली आहे. चिनी बॅडमिंटनपटू झांग झिजीचा कोर्टवरच कोसळून कार्डियक अरेस्टने मृत्यू झाला. रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली. झांग झिजीने किंडरगार्टनमध्ये बॅडमिंटन खेळायला सुरुवात केली होती. इंडोनेशियाच्या जकार्ता येथे एका टुर्नामेंटमध्ये झांग झिजी बॅडमिंटन खेळताना बेशुद्ध होऊन खाली कोसळला. त्याचा कार्डियक अरेस्टमुळे मृत्यू झाला.



### मास्टर विजय तांबडकर यांना इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सिकईव्दारे

## 'डेप्युटी ग्रॅन्ड मास्टर इन सिकई'पदवी बहाल!

**। कोर्लई । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा सिकई मार्शल आर्ट संघटनेचे अध्यक्ष मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर यांना इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सिकईच्यावतीने ९ वी डिग्री सह 'डेप्युटी ग्रॅन्ड मास्टर इन सिकई' पदवी बहाल करण्यात आली असून असा सन्मान प्राप्त करणारे ते कोकण विभागातील पहिले तर संपूर्ण महाराष्ट्रात तिसरे मानकरी ठरले आहेत.

या यशाबद्दल सिकई असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष मजहर खान, महासचिव रविंद्र गायकी आणि त्यांच्या चाहत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सिकई आणि सिकई फेडरेशन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनात जम्मू-कश्मिर सिकई असोसिएशनच्यावतीने २२ जुन ते २७ जुन दरम्यान १७ वा इंटरनॅशनल हाय ॲप्टिट्यूड ट्रेनिंग कॅम्प पहलगाम काश्मीर येथे आयोजित करण्यात आला. देशविदेशातील २५० पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये महाराष्ट्रातील २२ खेळाडूंनी सहभाग घेतला. या शिबिरात मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर यांना इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ सिकई व्दारे नववी डिग्री देऊन डेप्युटी ग्रॅन्ड मास्टर इन सिकई अशी पदवी बहाल करून गौरवण्यात आले. तसेच नागपूरचे मास्टर दिनेश राऊत यांना ७ वी डिग्री देऊन सन्मानीत करण्यात आले.




## आराध्या बुद्धीबळाच्या पटावर राज्यात अव्वल

**। उरण। वार्ताहर ।**

कल्याण येथे झालेल्या राज्यस्थारीय बुद्धीबळ स्पर्धेमध्ये सहा पैकी सहा खेळ जिंकून, उरणची आठ वर्षीय आराध्या विनेश पुरव ही राज्यात अव्वल ठरली आहे. आराध्याने या आधी सुद्धा खेळातील आपली चमक दाखवत बुद्धीबळ प्रेमिंना चकित केले आहे. तर भविष्यात देशाचे प्रतिनिधित्व करणे हे तिचे लक्ष असल्याचे ती सांगत आहे.

रविवार ३० जून रोजी 'कल्याण तालुका बुद्धिबळ संस्था' आणि 'ठाणे जिल्हा चेस असोसिएशन' आयोजित ३ री राज्यस्थरीय मरॅपिड चेस स्पर्धा मेट्रो मॉल, कल्याण येथे घेण्यात आली. सदर स्पर्धेत ३८ स्पर्धाकांनी सहभाग नोंदवला. आराध्याला ट्रॉफी आणि सायकल देऊन गौरवण्यात आले. आराध्याच्या या विजयामुळे ती राज्यात अव्वल ठरली आहे. उरणमधील यु. ई. एस शाळेमध्ये इयत्ता तिसरीमध्ये शिकणाऱ्या आराध्याने बुद्धिबळ खेळाचे सुरुवातीचे धडे प्रशिक्षक संदीप पाटील यांच्याकडे घेतले. तिच्या या प्रयत्नामध्ये तिचे वडील विनेश पुरव मदत करत आहेत. तीला बुद्धिबळाचा पट आंतरराष्ट्रीय स्थरावर मांडून देशाचे नेतृत्व करायचे असल्याचे ति ने सांगितले.



### इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचा नवा आध्याय

# तरूणाईसाठी उभारलं हक्काचं व्यासपीठ

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

भारतात क्रिकेटची असलेली प्रसिद्धी अनेक नामांकित खेळांना आणि त्या खेळातील खेळाडूंना पडद्यामागे टाकते यात शंका नाही. कबड्डी, फुटबॉलप्रमाणे मोटरस्पोर्ट्स हा देखील एक धाडसी खेळ म्हणावा लागेल.

दिसतं तसं काही नसतं याचा प्रत्यय या खेळातून नक्कीच येतो. याच खेळाला नवीन व्यासपीठ मिळावे यासाठी पुण्यात इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगने एक नवीन अध्याय सुरू केला आहे. यंदा दुसऱ्या पर्वाचे आयोजन केले जात आहे.



लीगच्या इथपर्यंतच्या प्रवासाबद्दल बोलताना इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचे संचालक आणि सह संस्थापक ईशान लोखंडे यांनी विविध बाबींवर प्रकाश टाकला. उद्घाटनाच्या हंगामात प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. पुणे, अहमदाबाद आणि बंगळुरू येथे पहिला हंगाम पार पडला. ईशान लोखंडे हे स्वतः एक टेनिसपटू होते. या खेळाने त्यांना आकर्षित केले. या खेळात युवा पिढीने कारकीर्द घडवावी आणि त्यासाठी त्यांना हक्काचं व्यासपीठ मिळावे यासाठी त्यांनी इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग आणली. हा प्रवास इथवर न थांबवता पुढील पिढी घडविण्यासाठी अकादमी काढण्याचा त्यांचा विचार आहे. हा खेळ केवळ मुलांकरिता नसून यात ११ वर्षांच्या दोन मुलीही उत्तम कामगिरी करत असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात या मुली मुलांनाही टक्कर देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या देशात अनेक असे स्टार रायडर्स आहेत. पण, या खेळाला तितकीशी प्रसिद्धी नसल्याने किंबहुना याचा प्रचार नसल्याने ते पडद्यामागे जातात.

अशाच काही खेळाडूंना आणि नवीन तरूण-तरूणींना या क्षेत्रात करिअर करता यावे, स्वतःची प्रतिभा सिद्ध करता यावी यासाठी आम्ही एक व्यासपीठ तयार केले आहे. इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचे आयोजन करताना आम्हाला अनेक संकटांचा सामना करावा लागल्याचे त्यांनी सांगितले.

## आजोबांच्या पावलावर पाऊल

**लंडन :** बॉलिवूडचा आघाडीचा अभिनेता सैफ अली खान याचे वडील मन्सूर अली पतौडी हे भारतीय क्रिकेट संघाचे दिग्गज फलंदाज होते. आता सैफ-करीनाचा मुलगा तैमूर आपल्या आजोबांच्या पावलावर पाऊल ठेवत असल्याचे दिसते. तैमूरने क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्सवर फलंदाजी सैफ अली खान-करीना कपूर हे आपल्या मुलांसह लंडनमध्ये आहेत.

सैफ अली खान हा तैमूरला क्रिकेटसंबंधी माहिती देताना आजोबांबद्दल सांगितले. तसेच त्याला इंग्लंडमधील कौंटी क्रिकेटची माहिती देखील दिली.

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनची राज्य पॅनलवर निवडीसाठी स्कोअरर्सची परीक्षा

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने राज्य पॅनलवर स्कोअरर्सना समाविष्ट करण्यासाठी जुलै व ऑगस्ट २०२४ मध्ये एक परीक्षा आयोजित करणार आहे. हि परीक्षा सर्व उमेदवारांसाठी खुली आहे. परीक्षा शुल्क ५०० अधिक जीएसटी म्हणजे एकूण ५९० रुपये एवढी असेल. परीक्षेसाठी नोंदणी करण्यासाठी अंतिम तारीख ७ जुलै २०२४ आहे. या तारखेनंतर प्राप्त झालेल्या नोंदणी स्वीकारल्या जाणार नाहीत.

नोंदणी फार्ममध्ये प्रदान केलेल्या एमसीए क्यूआर कोडवर पेमेंट करणे आवश्यक आहे, पेमेंटचा पुरावा (स्क्रिनशॉट) अपलोड करणे आवश्यक आहे, नोंदणीच्या अंतिम तारखेनंतर सर्व उमेदवारांना अभ्यासक्रम, स्वरूप आणि परीक्षेचे वेळापत्रक कळवले जाईल, प्राप्त झालेल्या नोंदणीच्या संख्येवर अवलंबून, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मुख्य राज्य पॅनल परिक्षेपूर्वी प्राथमिक तपासणी परीक्षा आयोजित करू शकते, नोंदणीमध्ये चुकीची माहिती दिली असल्यास किंवा परीक्षा शुल्क न भरल्यास नोंदणी न स्वीकारण्याचा अधिकार महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन राखून ठेवला आहे.

अधिक माहितीसाठी मंगेश नाईक मो.नं ९८२३४३८९११ यांच्याशी संपर्क साधाव, असे आवाहन करण्यात आले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)